दैनिक

# सिंहवाणी वृत्त

प्रखर लेखणीचा साक्षीदार

दिनांक : शुक्रवार, ९ ऑक्टोबर २०२६

Mail Id : sinhvanivrutta@gmail.com

Epaper : epaper.sinhvani.com

पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : ३०० | किंमत : २ रूपये

Reg. No : MHBIL/25/A4140



# अभिनयाचा युगपुरुष हरपला!

**डोणजे गावात भावपूर्ण वातावरणात नाना पाटेकरांना शेवटचा निरोप**

***दैनिक सिंहवाणी वृत्त विशेष :*** *ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांचे आज (८ ऑक्टोबर) निधन झालं आहे. वयाच्या ७५ व्या वर्षी नाना पाटेकर यांनी अखेरचा श्वास घेतला. गोव्यातील डोना पावलामधील घरी नाना पाटेकर हृदयविकाराचा झटका आला. त्यानंतर त्यांना मणिपाल रुग्णालयात हलवण्यात आले होते. मात्र याचवेळी नाना पाटेकर यांचा मृत्य झाला. नाना पाटेकर यांचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला. गोव्यातील डोना पावलामधील घरी हृदयविकाराचा झटका आला होता. त्यानंतर त्यांना मणिपाल रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र तिथेच उपचारादरम्यान नाना पाटेकर यांचं निधन झाल्याची माहिती समोर आली. मणिपाल रुग्णालयाचे कर्करोग विभाग प्रमुख डॉ. शेखर सालकर यांनी ४५ मिनिटे सतत सीपीआर देऊनही नाना पाटेकर यांना वाचवता आले नाही.*

*गोव्यातील मणिपाल रुग्णालयाच्या वैद्यकीय पथकाने नाना पाटेकर यांना पहाटे ५.२० वाजता मृत घोषित केले. छातीत तीव्र वेदना होत असल्याने एका फ्लॅटवर वैद्यकीय पथक पाठवण्यात आले होते; तिथे ते प्रतिसाद देत नव्हते. त्यांना 'कार्डियाक मसाज' देऊन रुग्णालयात आणले असता, तेथील वैद्यकीय पथकाने पहाटे ५.२० वाजता त्यांना मृत घोषित केले. हे प्रकरण 'मेडिको-लीगल' (वैद्यकीय-कायदेशीर) स्वरूपाचे असल्याने आज त्यांचे शवविच्छेदन केले. नाना पाटेकर यांची अभिनयाची जडणघडण रंगभूमीवर झाली. सुरुवातीच्या काळात त्यांनी मराठी नाटकांमध्ये काम केलं. त्यांच्या नाटकांचा उल्लेख करायचा झाला तर, 'पुरुष' मध्ये त्यांनी साकारलेला गुलाबराव आणि 'हमीदाबाईची कोठी' नाटकात साकारलेला सत्तार अजरामत केलाय. त्यानंतर हिंदी चित्रपटसृष्टीत प्रवेश करत १९७८ मध्ये आलेल्या 'गमन' या चित्रपटातून त्यांच्या फिल्मी कारकिर्दीला सुरुवात झाली. पुढील काही वर्षांत त्यांनी मराठी आणि हिंदी अशा दोन्ही भाषांतील चित्रपटांमध्ये भूमिका केल्या. नाना पाटेकर केवळ दिग्गज अभिनेतेच नाहीतर, सामाजिक भान जपणारे आणि असणारे अभिनेते होते. नाना पाटेकरांनी सप्टेंबर २०१५ मध्ये अभिनेते मकरंद अनासपुरे यांच्या बरोबर 'नाम फाउंडेशन' या धर्मादाय संस्थेची स्थापना केली. या संस्थेअंतर्गत महाराष्ट्रातील दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना विशेष करून मराठवाड्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना मदत केली जाते.*



भारतीय चित्रपट सृष्टीतील दिग्गज अभिनेते नाना पाटेकर यांच्या निधनाचे वृत्त अतिशय धक्कादायक आणि दुःखद आहे. त्यांना माझी भावपूर्ण श्रद्धांजली. नानांचे आणि माझे अतिशय जवळचे आणि मैत्रीपूर्ण संबंध होते. आपल्या दमदार अभिनयाने पाच दशकांहून अधिक काळ नाना पाटेकर यांनी मराठी व हिंदी चित्रपटांच्या माध्यमातून रसिक प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवले. आपल्या वैशिष्ट्यपूर्ण संवाद शैलीने त्यांनी चित्रपटातील अनेक पात्रं अजरामर केली व आपली वेगळी ओळख निर्माण केली. त्यांचे अकाली जाणे ही भारतीय चित्रपटसृष्टीची मोठी हानी आहे. 'नाम फाऊंडेशन'च्या माध्यमातून पाणी संरक्षण, संचयन क्षेत्रांत महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात त्यांनी केलेले कार्य उल्लेखनीय आणि महत्त्वपूर्ण आहे. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांसाठी त्यांनी दिलेला मदतीचा हात अनेक कुटुंबांचा आधार बनला. नाना एक उत्तम कलाकार-अभिनेते असण्याबरोबरच समाजाप्रती संवेदनशील असलेले एक व्यक्तिमत्त्व होते. ईश्वर दिवंगत आत्म्यास शांती प्रदान करो.

**– नितीन गडकरी, मंत्री, रस्ते वाहतूक व महामार्ग**
**भारत सरकार**

## नाना मला भाऊ आणि मार्गदर्शक मित्रासारखे : मुख्यमंत्री फडणवीस

नाना पाटेकर यांच्या मृत्यूनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस देखील गहिवरले. नानांच्या निधनाची माहिती मिळताच देवेंद्र फडणवीसांनी मल्हार पाटेकर यांच्याशी संवाद साधला आणि आपल्या शोकसंवेदना व्यक्त केल्या. तसेच नाना पाटेकर यांचे कार्य पुढे सुरू ठेवण्यासाठी सरकार कायम आपल्यासोबत असेल, असेही सांगितले. तसेच भारतीय



चित्रपटसृष्टीतील एक कसदार कलाकार आणि अत्यंत उत्तम माणूस असलेल्या नाना पाटेकर यांचे अचानक जाणे ही एक मोठी हानी आहे. 'क्रांतीवीर' ते 'नटसम्राट' अशा विविध चित्रपटांतून त्यांनी केवळ प्रेक्षकांचे मनोरंजनच केले नाही, तर त्यांना वैचारिक दृष्टीही दिली. तसेच ते एक देशभक्त म्हणूनही ओळखले जातात. त्यांनी सीमावर्ती भागात आपल्या सैनिकांसोबत काम केले आणि 'नाम' फाउंडेशनच्या माध्यमातून महाराष्ट्रात दुष्काळ निवारणाचे कार्य केले. विविध गावांमध्ये जलसंधारणासाठी त्यांनी घेतलेल्या पुढाकाराने अनेकांना प्रेरणा दिली आणि त्यामुळे त्यांना लोकांमध्ये प्रचंड लोकप्रियता मिळाली, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.



## नाना पाटेकर यांच्या निधनाने महाराष्ट्राची मोठी हानी, शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी त्यांचे मोठे योगदान : मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या निधनाने महाराष्ट्राची मोठी हानी झाली आहे. देश-विदेशातील मराठी माणसांसह त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर प्रेम करणाऱ्या प्रत्येकासाठी हा अतिशय दुःखाचा क्षण आहे, अशा शब्दांत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नाना पाटेकर यांना श्रद्धांजली वाहिली. प्रसार माध्यमांशी बोलताना चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, नाना पाटेकर यांच्यासोबत गेल्या अनेक वर्षांपासून काम करण्याची मला संधी मिळाली. गेल्या १५ वर्षांपासून त्यांनी मला लहान भाऊ मानून अनेक प्रकारे साथ दिली आणि मदतही केली. समाजात काम करताना, विशेषतः शेतकऱ्यांसाठी काम करताना काय केले पाहिजे, याचे मोठे व्हिजन त्यांच्याकडे होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली जलयुक्त शिवार अभियान राबविण्यात आले. नाम फाउंडेशनच्या माध्यमातून नाना पाटेकर यांनी संपूर्ण महाराष्ट्रात पाणीप्रश्न आणि शेतकऱ्यांच्या समस्यांवर काम केले. त्यांचे हे योगदान कायम स्मरणात राहील, असे बावनकुळे यांनी सांगितले. गेल्या वर्षी गणपती दर्शनासाठी नाना पाटेकर यांची भेट झाली होती. त्यानंतरही त्यांच्याशी संपर्क झाला. मुख्यमंत्री बळीराजा शेतपांदण रस्ते योजनेचे ब्रँड अँम्बेसेडर म्हणून त्यांनी काम करावे, अशी विनंती आपण त्यांना केली होती.

दुष्काळाच्या परिस्थितीतही शेतकऱ्यांमध्ये जाऊन त्यांच्याशी संवाद साधण्यासाठी आपण सोबत फिरू, असे आश्वासन त्यांनी मला दिले होते. प्रत्येक विभागात शेतकऱ्यांशी चर्चा करण्यासाठी येण्याचे त्यांनी मान्य केले होते, अशी आठवणही बावनकुळे यांनी सांगितली. नाना पाटेकर हे केवळ सिनेसृष्टीतील मोठे नाव नव्हते, तर त्यांच्या अभिनयाबरोबरच वागण्यातून आणि बोलण्यातून समाजसेवा, महाराष्ट्रसेवा आणि देशसेवेची भूमिका त्यांनी सातत्याने मांडली. महाराष्ट्रात नाना पाटेकर यांच्या रूपाने असा हिरा होता. त्यांच्या जाण्याने महाराष्ट्रासाठी मोठा धक्का बसला आहे, असे बावनकुळे म्हणाले. शेतकऱ्यांच्या प्रश्नांशी त्यांचे नाते किती घट्ट होते, याचा उल्लेख करताना बावनकुळे म्हणाले की, नाना पाटेकर यांनी स्वतःचे घरही शेतामध्ये बांधले होते. त्यामुळे ग्रामीण जीवन आणि शेतकऱ्यांच्या अडचणींशी त्यांचा प्रत्यक्ष संबंध होता.

## एअर ॲम्ब्युलन्सने पार्थिव पुण्यात आणले

निधनाचे वृत्त समजताच गोव्याहून नाना पाटेकरांचे पार्थिव विशेष एअर ॲम्ब्युलन्सद्वारे पुणे विमानतळावर आणण्यात आले. तिथून रस्तेमार्गे पार्थिव त्यांच्या डोणजे येथील फार्महाऊसवर अंतिम दर्शनासाठी ठेवण्यात आले. नानांच्या निधनाची बातमी पसरताच अवघा महाराष्ट्र हळहळला आणि चाहत्यांनी डोणजे गावाकडे धाव घेतली.

## राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील दिग्गजांची उपस्थिती

नाना पाटेकरांना अंतिम निरोप देण्यासाठी आणि श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी राजकीय, सामाजिक आणि चित्रपट क्षेत्रातील दिग्गज मान्यवर डोणजे गावात उपस्थित होते. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, मंत्री चंद्रकांत पाटील, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, रामदास आठवले, सुनील तटकरे, माधुरी मिसाळ, आमदार गोपीचंद पडळकर, अर्जुन खोतकर, रुपाली चाकणकर, सदाभाऊ खोत आणि उदय सामंत यांनी उपस्थित राहून पुष्पचक्र अर्पण केले. अभिनेते मकरंद अनासपुरे, नागराज मंजुळे, नीना कुलकर्णी, प्रवीण तरडे, सुरेश वाडकर, पुरुषोत्तम बेर्डे, सुशांत शेलार, लेखक अरविंद जगताप यांच्यासह 'नाम' फाउंडेशनचे प्रतिनिधी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नाना सारखा माणूस होणे नाही, अण्णा हजारे भावूक

ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे अभिनेते नाना पाटेकर यांच्या निधनाने अत्यंत भावूक झाले. त्यांना अश्रू अनावर झाले. नाना पाटेकर म्हणजे समाज आणि देशासाठी दीपस्तंभासारखे होते, असे अण्णा म्हणाले. जलसंधारण, नाम फाउंडेशन अशा अनेक क्षेत्रांत त्यांनी मोठे कार्य केले. त्यांचे जाणे म्हणजे समाजासाठी मोठी हानी असून, असा माणूस होणे नाही. ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे हे नाना पाटेकरांवर बोलताना अस्वस्थ झाले. त्यांच्या तोंडातून शब्दच फुटत नव्हते. डोळ्यातून अश्रू येत होते. नाना पाटेकरांचे कार्य दीपस्तंभासारखे आहे. त्यांनी खूप मोठे काम केले. असा माणूस होणार नाही, अशा शब्दात अण्णा हजारे यांनी नाना पाटेकर यांना श्रद्धांजली वाहिली आहे. नाना पाटेकर गेल्याचे वृत्त ऐकून अण्णा हजारेही अस्वस्थ झाले. मीडियासमोर त्यांना अश्रू आवरणे कठिण झाले. नाना सारखा



माणूस होणार नाही. त्यांनी फार मोठे काम केले आहे. नुसते काम केले नाही, वादळी सागरात संचार करणा-या नौकांना जसा दिपस्तंभ आधार असतो, तसे नाना पाटेकरांचे जीवन दीपस्तंभासारखे आधार होतें. समाज आणि देशासाठी नाना पाटेकर दीपस्तंभासारखे आधार होते. त्यांनी केवळ एकाच क्षेत्रात काम केले नाही. त्यांनी सर्वच क्षेत्रात खूप मोठे काम केले. साधा पाण्याचा प्रश्न त्यांनी उचलून धरला. पाणी अडवा, पाणी जिरवा. हे त्यांनी कृतीने करून दाखवले असे अण्णा हजारे म्हणाले.

अशी माणसे होणार नाही. त्यांच्या आत्म्याला चिरशांती लाभो, अशी ईश्वरचरणी प्रार्थना करतो. नाम फाऊंडेशनच्या माध्यमातून त्यांनी मोठे काम केले.समाजाला दिशा देणारेकाम झाले. माणसे येतात जातात. येणे-जाणे हे एका कालचक्रासारखे सुरू आहे. पण काही माणसं समाजाला दिशा देऊन जातात. देशाला नवीन दिशा देऊन जातात, असे काही माणसांचे जीवन असतं. नाना पाटेकरांच्या जीवनात ते पाहायला मिळालं, असंही अण्णा म्हणाले.

संपादकीय लेखणीतून...

# राहुल गांधींचे ठिय्या आंदोलन

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी आणि एसआयआरच्या मुद्यावरून इंडिया आघाडीने मंगळवारी काढलेल्या 'लोकशाही वाचवा'मोर्चाला दिल्ली पोलिसांनी अडवल्यानंतर राहुल गांधी आणि प्रियंका गांधी यांनी अचानक गनिमीकावा करत आकाशवाणी भवनात घुसून भवनाच्या मागच्या दारातून आयोगाच्या इमारतीपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला; पण पोलिसांनी मागच्या दरवाजावरच त्यांना घेरले. त्यानंतर त्यांनी तिथेच बाहेरच्या बाजूला ठिय्या दिला. राहुल गांधी म्हणाले, मला आयुक्तांना भेटून त्यांना सवाल करायचे आहेत; पण ते भेटायला तयार नाहीत. मी आंदोलनासाठी जिथे बसतो तिथून पोलिस मला उठवतात.

आता पोलिसांनीच सांगावे की मी कुठे बसू? इंडिया गेटवर बसू, जंतर मंतरवर बसू की फुटपाथवर बसू? आकाशवाणी भवनापासून केवळ ५० मीटरवर निवडणूक आयोगाची इमारत आहे. अखेर ८ तास ठिय्या दिल्यानंतर रात्री ८ वाजेच्या सुमारास पोलिसांनी राहुल-प्रियंकासह काँग्रेसच्या ५० खासदारांना ताब्यात घेतले आणि २ तासांनंतर त्यांना सोडून दिले. संसद भवनातील मकर द्वारापासून इंडिया आघाडीचा मोर्चा सकाळी ११ वाजता सुरू झाला. हा मोर्चा निवडणूक आयोगाकडे जाणार होता; परंतु पोलिसांनी तो मध्येच अडवल्यानंतर विरोधी पक्षांच्या खासदारांनीही आकाशवाणी भवन परिसरात आंदोलन केले. या आंदोलनात आम आदमी पक्ष आणि द्रमुक मात्र गैरहजर होते. दरम्यान आग्रा येथे ज्ञानेश कुमार यांच्या वडिलोपार्जित घरात त्यांच्या आई सत्यवती यांनी गंगाजल शिंपडून शुद्धीकरणाचा विधी केला.

२८ सप्टेंबर रोजी काँग्रेस कार्यकर्त्यांनी घराबाहेर केलेल्या आंदोलनामुळे घर अपवित्र झाल्याचा दावा त्यांनी केला. सकाळी ११ च्या सुमारास इंडिया आघाडीच्या खासदारांनी संसद भवनाच्या मकर द्वारापासून 'लोकशाही वाचवा', 'माझे मत वाचवा' अशा घोषणा देत निवडणूक आयोगाच्या कार्यालयाकडे जाण्यास सुरुवात केली. सुमारे ३०० खासदार मोर्चात सहभागी होते. या वेळी संसद परिसर आणि निवडणूक आयोगाच्या कार्यालयाच्या मार्गावर मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. ठिकठिकाणी बॅरिकेड उभारले होते. या मोर्चात काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे, राहुल गांधी, प्रियंका गांधी, समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव, तृणमूल काँग्रेसचे अभिषेक बॅनर्जी, डेरेक ओब्रायन, उबाठाचे अरविंद सावंत, संजय राऊत, अनिल देसाई यांच्यासह इंडिया आघाडीच्या १९ पक्षांचे खासदार सहभागी झाले होते. राहुल गांधी यांच्या हातात 'ज्ञानेश इट्स डन ब्रो' असा फलक होता. मोर्चा रोखल्याबद्दल संताप व्यक्त करताना राहुल म्हणाले, मोर्चात विरोधी पक्षाचे ३०० खासदार आहेत. ते ज्ञानेश कुमारांना भेटू इच्छितात; परंतु आम्हाला रोखण्यात आले. नक्की काय अडचण आहे ते आम्हाला समजत नाही. जर निवडणूक आयोग लोकप्रतिनिधींनाच भेटणार नसेल तर मग लोकशाहीचा अर्थ काय? राहुल गांधी म्हणाले, भाजप काय म्हणते याची मला पर्वा नाही. मी भारताची लोकशाही वाचवण्यासाठी येथे उभा आहे. नरेंद्र मोदी, अमित शहा, मोहन भागवत आणि ज्ञानेश कुमार यांनी देशातील लोकशाही संपवली आहे. ह्यमतचोरीह्व करून देशाचा ताबा घेण्यात आला. त्यासाठी ज्ञानेश कुमारांनी मदत केली.

या सर्वांविरोधात कारवाई होईल, कोणीही वाचणार नाही. जर त्यांनी मतचोरी केली नसती तर ते आम्हाला भेटायला तयार झाले असते. सपा नेते अखिलेश यादव म्हणाले, भाजपचे लोक घाबरले आहेत म्हणूनच सर्वत्र बॅरिकेड लावले आहेत. २०१७ ते २०२४ च्या निवडणुकीत निवडणूक आयोगाने बेईमानी केली. बंगालमध्ये तर खुलेआम खेळ केला. उत्तर प्रदेशातील पोटनिवडणुकांमध्येही मतांची चोरी कशी झाली ते स्पष्ट आहे. निवडणुकीतील पराभवामुळे काँग्रेस अस्वस्थ झाली आहे, अशी टीका भाजपने केली. निवडणुकांमधील सातत्यपूर्ण पराभवामुळे काँग्रेस निराधार विधाने आणि खोटे दावे करून देशाची दिशाभूल करत आहे, अशी टीका भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते सुधांशू त्रिवेदी यांनी केली. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, भारतातील संवैधानिक संस्थांना बदनाम करणे हा काँग्रेस आणि त्यांना साथ देणा-या इतर पक्षांचा उद्देश आहे. संविधानाने तयार केलेल्या सर्व संस्था कुचकामी असून त्या न्याय देऊ शकत नाहीत, अशी भावना जनतेमध्ये निर्माण करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. एकदा ही भावना रूजली की पुढे संविधानच न्याय देऊ शकत नाही, असे सांगण्याचा त्यांचा प्रयत्न असेल.

# निवडणूक चिन्हांचं त्रांगडं

झाडाझडती



विनोद देशमुख
ज्येष्ठ पत्रकार, नागपूर

आपल्या लोकशाहीचा अमृत महोत्सव उलटून गेल्यावरही आपल्याकडे निवडणुका पक्षाच्या किंवा उमेदवाराच्या नावापेक्षा चिन्हांवर घ्याव्या लागतात, ही गोष्ट फार भूषणावह नाही. स्वातंत्र्य मिळण्याच्या प्रारंभीच्या काळात हे ठीक होतं. कारण, देशात साक्षरतेचं प्रमाण अत्यंत कमी होतं आणि साक्षरता वाढीचा दरही कमी होता. त्यामुळे, अधिकाधिक मतदारांनी निवडणुकीत भाग घेण्याच्या दृष्टीनं चित्ररूपी खूण (चिन्ह) चलनात आणली गेली. लोकशाहीच्या अगदी सुरुवातीला एकेका मतपेटीवर पक्षाचं नाव-चिन्ह असायचं आणि मतदार त्यात कोरी चिठ्ठी टाकायचे. पुढे यात बदल करण्यात आला. सर्व चिठ्ठ्या एकाच मतपेटीत टाकायचं ठरलं आणि त्यादृष्टीनं चिठ्ठीवर उमेदवाराचं नाव, पक्ष, चिन्ह छापलेलं असायचं आणि त्यासमोर शाईचा ठप्पा मारावा लागत असे. आता ऑनलाईनच्या जमान्यात ठप्प्याच्या ऐवजी ईव्हीएम मशीनवर क्लिक करावं लागतं. एवढ्या आधुनिक काळातही पक्षचिन्ह कायम आहे, ही आश्चर्याचीच गोष्ट नाही का!

साक्षरतेचा दर १९५१ मध्ये १८.३३ टक्के होता, तो साठ वर्षात (२०११) चौपट, ७४ टक्के झाला. देशाची लोकसंख्या याच कालावधीत दुप्पट, म्हणजे ३६ कोटींवरून १२१ कोटी झाली. ही प्रगती पाहता निवडणुकांमधून चिन्ह हद्दपार व्हायला हवं होतं. ते तर झालं नाहीच; उलट चिन्हांचे घोळ मात्र वाढतच चालले आहेत. शिवसेना, राष्ट्रवादी कॉंग्रेस आणि तृणमूल कॉंग्रेस या तीन पक्षांच्या चिन्हांची कहाणी हीच गोष्ट अधोरेखित करीत आहे.

२०२२ मध्ये शिवसेना फुटल्यानंतर निवडणूक आयोगानं मूळ पक्षचिन्ह धनुष्यबाण शिंदे गटाला आणि उद्धव ठाकरे गटाला मशाल हे नवीन चिन्ह दिलं. तसंच, २०२३ मध्ये अजित पवारांसह मोठा गट राष्ट्रवादीतून बाहेर पडला तेव्हा मूळ पक्षचिन्ह घड्याळ त्यांच्या गटाला देण्यात आलं आणि शरद पवारांच्या गटाला तुतारी हे नवीन चिन्ह मिळालं. या दोन्ही प्रकरणांमध्ये पक्षाचं मूळ नाव फुटिरांना देण्यात आलं आणि मूळ नावात 'उद्धव बाळासाहेब ठाकरे', तसंच 'शरच्चंद्र पवार' हे शब्द कंसात जोडून त्यांच्या पक्षांचं नवीन नाव तयार करण्यात आलं. या बदलासह लोकसभा (२०२४) आणि विधानसभा (२०२५) या निवडणुकाही या चार पक्षांनी लढवल्या. तथापि, पक्षचिन्ह आणि नाव याबद्दलचे त्यांचे दावे सुप्रीम कोर्टात प्रलंबित आहेत.

यंदाच्या बंगाल विधानसभा निवडणुकीनंतर अशीच मोठी पक्षफूट तृणमूल काँग्रेस पक्षात झाली, तेव्हा मात्र निवडणूक आयोगानं पक्षाचं नाव आणि चिह यासंदर्भात वेगळाच निर्णय दिला. मूळ नाव आणि पक्षचिन्ह हे दोन्ही त्यांनी गोठवून टाकले. (म्हणजे, दोघांपैकी कोणालाही नाही.) ममता बॅनर्जी गटाला 'ममता ऑल इंडिया तृणमूल कॉंग्रेस' हे नाव अन् 'फुटबॉल खेळाडू' हे चिन्ह देण्यात आलं, तर बाहेर पडलेल्यांना 'डेमोक्रॅटिक तृणमूल काँग्रेस' नावासह 'लिफाफा' हे नवं चिन्ह मिळालं. ही दोन्ही प्रकरण सुद्धा न्यायालयात गेली आहेत.

यातील शिवसेना विरुद्ध शिवसेना या दाव्याच्या सुनावणीत परवा सुप्रीम कोर्टात स्वतः न्यायमूर्तींनीच एका वेगळा आणि बुचकळ्यात टाकणारा प्रश्न विचारला. "मूळ पक्षाच्या चिन्हाचा अधिकार पक्षांतर करणाऱ्यांचा की आता पक्ष फोडल्याची तक्रार करणाऱ्यांचा", असा प्रश्न न्या. बागची यांनी प्रतिवादीच्या वकिलांना केला. हे काय विचारणं झालं, मिलॉर्ड ! चिन्ह हे पक्षाचं असतं आणि पक्ष हा बहुमताचा असतो. जिकडे बहुमत त्यांचा पक्ष. आणि, बहुमत साध्या सदस्यांच्या संख्येत मोजणं शक्य नसतं. म्हणून लोकप्रतिनिधी-खासदार, आमदार यांची संख्या बहुमत ठरवते.

हे लोक ज्यांचे जास्त, त्यांचाच पक्ष होतो. पक्ष त्यांचा म्हणून पक्षचिन्हही त्यांचंच, असं सरळसाधं सूत्र आहे. फक्त एकच काळजी घ्यावी लागेल, मिलॉर्ड. शिवसेना आणि तृणमूल काँग्रेस या दोघांनाही एकच न्याय लावा. पहिल्या निर्णयात, सारखंच प्रकरण असूनही, तीन दाव्यांमध्ये दोन वेगळे निकाल देण्यात आले. ए चोलबे ना, दादा ! खरं सांगायचं तर, ही चिन्हंच मिटवून टाकली पाहिजे. आजच्या एआयच्या काळात कसलं आलंय. चिन्ह. निरक्षरतेचा कहर !!

## 'झेन जी' चा हुंकार:
# फ्रान्समध्ये शाळा सुधारणा आंदोलन!

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

फ्रान्समधील शिक्षण व्यवस्था सुधारण्यासाठी सध्या तेथील 'जेन जी' (जेनझी - आजची तरुण पिढी) म्हणजेच शालेय विद्यार्थ्यांनी संपूर्ण देश हादरवून सोडणारे एक मोठे आंदोलन सुरू केले आहे. सप्टेंबर २०२६ च्या उत्तरार्धापासून सुरू झालेल्या या आंदोलनामुळे फ्रान्समधील शेकडो शाळा बंद पडल्या असून, शिक्षण व्यवस्थेतील दुरवस्थेविरोधात विद्यार्थ्यांनी रस्त्यावर उतरून एल्गार पुकारला आहे.

शैक्षणिक आंदोलनाची धग आता फ्रान्समध्ये देखील बघायला मिळत आहे.सध्या फ्रान्समध्ये शिक्षण सुधारणा, अर्थसंकल्पीय कपात आणि शिक्षकांच्या कमतरतेविरोधात एक अतिशय मोठे आणि तीव्र आंदोलन सुरू आहे. पॅरिसच्या उपनगरांमधून सुरू झालेले हे आंदोलन आता संपूर्ण फ्रान्समध्ये पसरले आहे.

शाळा सुधार आंदोलनामध्ये हायस्कूलचे विद्यार्थी, शिक्षक आणि पालक मोठ्या संख्येने सहभागी झाले असून ३ लाखांहून अधिक लोक रस्त्यावर उतरले आहेत. फ्रान्समधील जवळपास ७३५ हून अधिक शाळांच्या कामकाजावर याचा थेट परिणाम झाला आहे. शिक्षक भरतीची समस्या भारतातच आहे, असे नसून फ्रान्समधील अनेक शाळांमध्ये गणिते, इंग्रजी आणि मानव्यविद्या यांसारख्या महत्त्वाच्या विषयांचे शिक्षकच उपलब्ध नाहीत. शिक्षकांच्या कमतरतेमुळे शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीपासूनच अनेक तासिका रद्द करण्यात आल्या आहेत. सरकारने शिक्षण क्षेत्राच्या बजेटमध्ये कपात केल्याने विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड रोष आहे. (सरकारचे म्हणणे आहे की लोकसंख्या कमी झाल्यामुळे हा निर्णय घेतला आहे, परंतु आंदोलकांना हे मान्य नाही.

अनेक शाळांमधील पायाभूत सुविधा अत्यंत खराब आणि अस्वच्छ (आहेत. शाळांमध्ये पुरेशी संसाधने, परिचारिका आणि सामाजिक कार्यकर्ते मिळावेत अशी आंदोलकांची मागणी आहे. २०१८ मध्ये करण्यात आलेल्या शैक्षणिक सुधारणांनंतर वर्गांचे वेळापत्रक अत्यंत गुंतागुंतीचे आणि थकवणारे बनले आहे, ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक आयुष्यावर परिणाम होत आहे. शैक्षणिक संस्थांमध्ये पायाभूत सुविधांचा अभाव बघता फ्रान्समधील झेंजी आता रस्त्यावर उतरले आहेत.अनेक ठिकाणी आंदोलक आणि पोलिसांमध्ये तीव्र धुमश्चक्री झाली आहे. शाळांसमोर जाळपोळ आणि तोडफोड झाल्याच्या घटनांनंतर पोलिसांनी अश्रुधुराचा वापर केला आणि आतापर्यंत १,७४७ हून अधिक आंदोलकांना अटक करण्यात आली आहे. सुरुवातीला केवळ हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी सुरू केलेल्या या आंदोलनाला आता शिक्षकांच्या संघटना, पालक आणि अग्निशमन दलाच्या जवानांनीही पाठिंबा दिला आहे.

आंदोलनामुळे फ्रान्समधील ७०० हून अधिक शाळा प्रभावित झाल्या असून, सुरक्षा कारणास्तव शेकडो शाळा पूर्णपणे किंवा अंशतः बंद ठेवण्यात आल्या आहेत.

या ऐतिहासिक आणि तीव्र आंदोलनाची दखल घेत फ्रान्सचे पंतप्रधान सेबॅस्टिन लेकोर्नू यांनी परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यासाठी अंतर-मंत्रालयीन आणीबाणी कक्षाची बैठक बोलावली आहे. दरम्यान, फ्रान्सचे शिक्षण मंत्री एडवर्ड जेफ्राय यांनी वाढत्या फीच्या काही योजना रद्द करत विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला, तसेच शिक्षकांच्या कमतरतेवर आराखडा तयार करण्याचे आश्वासन दिले. मात्र, विद्यार्थी संघटनांनी हे आश्वासन म्हणजे केवळ 'धूळफेक' असल्याचे सांगत आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा दिला आहे.

- ९५६१५९४३०६

# हरमनप्रीत पायउतार तर स्मृती बोहल्यावर: भारतीय महिला क्रिकेट एका नव्या वळणावर!

**आक्रमक हरमनप्रीतच्या नेतृत्वातील स्थित्यंतराची चर्चा, आरसीबीला चॅम्पियन बनवणारी स्मृती आता आयुष्याच्या नव्या खेळपट्टीवर**

डॉ.दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

भारतीय महिला क्रिकेट सध्या एका अत्यंत संवेदनशील आणि ऐतिहासिक संक्रमणाच्या उंबरठ्यावर येऊन ठेपले आहे. एका बाजूला भारतीय संघाला आक्रमकतेची नवी ओळख देणारी धडाकेबाज कर्णधार हरमनप्रीत कौर हिच्या नेतृत्वपदाच्या वाटचालीतील नव्या वळणाची कुजबुज सुरू आहे, तर दुसऱ्या बाजूला नजाकतदार फलंदाजीने जगाला भुरळ घालणारी उपकर्णधार स्मृती मानधना हिच्या आयुष्यातील नव्या इनिंगची, म्हणजेच विवाहबंधनाची, चर्चा क्रीडावर्तुळात रंगली आहे. खेळपट्टीवरील नेतृत्वबदल आणि मैदानाबाहेरील सनई-चौघडे यांचा हा संगम क्रीडाप्रेमींसाठी लक्षवेधी ठरला आहे.

**हरमनप्रीत कौरः निर्भय आक्रमकतेचा सुवर्णकाळ**

मिथाली राजनतंर हरमनप्रीत कौरने भारतीय संघाची सूत्रे हाती घेतली आणि महिला क्रिकेटचा पारंपरिक चेहरामोहरा पूर्णपणे बदलून टाकला. 'बॅकफूटवर न जाता डोळ्यात डोळे घालून भिडायचे' ही वृत्ती तिने संघात रुजवली.

ऐतिहासिक यशः तिच्या नेतृत्वाखाली भारताने २०२२ राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत ऐतिहासिक रौप्यपदक आणि २०२३ आशियाई क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले.

कसोटीतील दबदबाः प्रदीर्घ कालावधीनंतर मायदेशात झालेल्या कसोटी सामन्यांमध्ये इंग्लंड आणि बलाढ्य ऑस्ट्रेलियाला एकामागून एक धूळ चारून तिच्या संघाने इतिहास रचला.

डब्ल्यूपीएल चषकः महिला प्रीमियर लीगच्या (डब्ल्यूपीएल) पहिल्या सत्रासह मुंबई इंडियन्सला दोन विजेतेपद मिळवून देत तिने आपले नेतृत्वगुण सिद्ध केले.

आयसीसी स्पर्धांच्या निर्णायक नॉकआउट सामन्यांमध्ये काही विजय हुकल्याने नेतृत्वबदलाची चर्चा सुरू झाली असली, तरी खेळात अशा जबाबदाऱ्या बदलणे ही नैसर्गिक प्रक्रिया असते. 'पायउतार' होणे म्हणजे पराभव नव्हे, तर नव्या नेतृत्वाला वाट मोकळी करून देत स्वतःच्या फलंदाजीला पुन्हा मोकळा श्वास देण्याची ती एक संधी असते.

**स्मृती मानधनाः शांत नेतृत्व आणि आरसीबीची चॅम्पियन**

मैदानाच्या एका टोकाला हरमनची आक्रमकता असताना दुसऱ्या टोकाला स्मृती मानधनाची क्लासिक फलंदाजी भारताचा भक्कम आधार ठरली. हरमनला उपकर्णधार म्हणून विश्वासू साथ देणाऱ्या स्मृतीने कर्णधार म्हणूनही स्वतःचे कर्तृत्व सिद्ध केले आहे.

आरसीबीचे ऐतिहासिक जेतेपदः डब्ल्यूपीएल २०२४ व २०२६ मध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) चे नेतृत्व करताना तिने संघाला चषक जिंकून दिले. अत्यंत शांत आणि रणनीतिक निर्णय घेत तिने हे यश मिळवले.

जागतिक दर्जाचे सातत्यः आयसीसीची 'वर्षातील सर्वोत्तम महिला क्रिकेटपटू' हा बहुमान दोनदा पटकावणारी स्मृती भारताची तिन्ही फॉरमॅटमधील आघाडीची फलंदाज आहे. हरमनच्या अनुपस्थितीत तिने राष्ट्रीय संघाचे नेतृत्वही अत्यंत समर्थपणे पेलले आहे.

**वैयक्तिक आयुष्यातील नवी इनिंग**

केवळ मैदानावरच नव्हे, तर वैयक्तिक आयुष्यातही स्मृती एका नव्या टप्प्यावर पाऊल ठेवत आहे. प्रसिद्ध संगीतकार पलाश मुच्छल यांच्यासोबतचा नियोजित विवाह मोडल्या नंतर स्वतःला सावरत तीने स्वतःच्या क्रिकेटवर कुठलाही परिणाम होऊ दिला नाही.

**एका युगाचा संकोच, दुसऱ्या युगाचा प्रारंभ**

हरमनप्रीत कौरने ज्या आक्रमकतेचा पाया रचला, त्यावर स्मृती मानधना आपल्या संयमी आणि चतुर नेतृत्वाने यशाचा डोलारा उभारू शकते. हरमनच्या दांडग्या अनुभवाची सावली आणि स्मृतीची नवी ऊर्जा यातून भारतीय महिला क्रिकेट एका नव्या सुवर्णकाळाकडे वाटचाल करेल यात तिळमात्र शंका नाही.

- ९०९६३७२०८२

# सिनेसृष्टीतील तारा आणि सामाजिक परखड व्यक्तीमत्त्व काळाच्यापल्याड नाहिसा

सुनील शिरपुरे
यवतमाळ

नटसम्राट नाना पाटेकर यांच्या अकाली निधनाने एक उत्तम अभिनेता आणि सामाजिक भान असलेला लोकप्रिय कलाकार गमावल्याची भावना सर्वत्र व्यक्त केली जात आहे. ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांचं वयाच्या ७५ व्या वर्षी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झालं आहे. मराठी सिनेसृष्टीसह बॉलिवूडमध्येही आपल्या अभिनयाचा ठसा उमटवलेल्या नाना पाटेकर यांच्या निधनाने कलाविश्वासह महाराष्ट्रावरही शोककळा पसरली आहे. नानांच्या रुपाने प्रतिभावंत कलाकारासह सामाजिक भान असलेले उमदे व्यक्तिमत्व हरपल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. कलाकार सामाजिक, राजकीय भूमिका घेत नसल्याचा आक्षेप वारंवार घेतला जातो. मात्र नाना पाटेकर हे नेहमीच याला अपवाद राहिले.

नाना पाटेकर यांना गोव्यातील दोना पावला येथील घरी हृदयविकाराचा तीव्र झटका आल्यानंतर त्यांना उपचारासाठी तातडीने मणिपाल रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तेथे डॉक्टरांनी त्यांना ४५ मिनिटे 'कार्डिओ पल्मोनरी रिसुसिटेशन (सीपीआर) अर्थात हृदय व फुफ्फुसांचे पुनरुज्जीवन' देऊन त्यांचे प्राण वाचवण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. मात्र उपचारांदरम्यान पहाटे ५ वाजून २० मिनिटांनी त्यांची प्राणज्योत मालवली.

नाना पाटेकर यांचा जन्म १ जानेवारी १९५१ रोजी महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यातील मुरुड-जंजिरा येथे एका मराठी कुटुंबात झाला. त्यांचे खरे नाव विश्वनाथ पाटेकर आहे. हे नाव फार थोड्या लोकांना माहीत आहे. त्यांचे वडील गजानन पाटेकर व्यापारी होते, तर आई निर्मला पाटेकर गृहिणी होत्या. नाना पाटेकर यांना अशोक आणि दिलीप पाटेकर असे दोन भाऊ आहेत. त्यांच्या पत्नीचे नाव नीलकंती पाटेकर असून त्या बँक अधिकारी होत्या. नाना पाटेकर यांना दोन मुले, मात्र त्यापैकी एका मुलाचे दुर्दैवाने निधन झाले, तर



मल्हार नावाचा मुलगा आहे. चित्रपटसृष्टीमध्ये ते नाना पाटेकर या नावाने परिचित झाले होते. व्यक्तिमत्त्वातील जरब, जबरदस्त संवादफेक या बळावर त्यांनी मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीत आपलं वेगळं स्थान निर्माण केलं होतं.

नाना पाटेकर यांनी मुंबईत राहून शालेय शिक्षण पूर्ण केले. त्यांची शाळा समर्थ विद्यालय होती. त्यानंतर त्यांनी वांद्रे स्कूल ऑफ आर्टमध्ये (आताचे एल.एस. रहेजा स्कूल ऑफ आर्ट) शिक्षण घेतले आणि सर जे.जे. स्कूल ऑफ आर्टमधून पदवी घेतली आहे. चित्रपट क्षेत्रात नाना पाटेकर यांनी १९७८ मध्ये 'गमन' या सिनेमातून पदार्पण केले. त्यानंतर त्यांनी कधीच मागे वळून पाहिले नाही. त्यांच्या अभिनयाला तीन राष्ट्रीय पुरस्कार, दोन फिल्मफेअर पुरस्कार मिळाले असून २०१३ मध्ये भारत सरकारने त्यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित केले आहे.

याशिवाय अनेक प्रतिष्ठित पुरस्कार आणि सन्मान त्यांच्या नावावर आहेत. प्रहार चित्रपटाच्या तयारीसाठी तीन वर्षांच्या प्रशिक्षण कालावधीनंतर नाना यांना १९९० मध्ये भारतीय प्रादेशिक सैन्यात मानद कॅप्टन म्हणून नियुक्त करण्यात आले आणि त्यांनी जनरल व्ही.के. सिंग यांच्यासोबत काम केले, ज्यांच्याकडे त्यावेळी कर्नलची रँक होती आणि त्यांचा एक कॅमिओ होता. १९९९ मध्ये कारगिल युद्धादरम्यान, नाना पाटेकर यांनी मराठा लाईट इन्फंट्री रेजिमेंटमध्ये मानद मेजर म्हणूनही सेवा दिली आहे.

नाना पाटेकर यांनी अभिनयासोबत सामाजिक क्षेत्रामध्येही आपल्या कायार्ची छाप पाडली होती. त्यांनी नाम फाऊंडेशनच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी सामाजिक कार्य सुरु केले होते. समाजातील वंचित घटकांसाठी, प्रामुख्याने दुष्काळग्रस्त आणि आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांसाठी मोठे सामाजिक कार्य केले आहे. सप्टेंबर २०१५ मध्ये अभिनेते मकरंद अनासपुरे यांच्यासह त्यांनी नाम फाउंडेशन या संस्थेची स्थापना केली. महाराष्ट्रातील विदर्भ आणि मराठवाडा (लातूर, उस्मानाबाद) परिसरातील दुष्काळ आणि कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबांना त्यांनी प्रत्यक्ष भेट देऊन आर्थिक मदत केली.

दुष्काळमुक्तीसाठी गावांमध्ये नद्यांचे खोलीकरण, गाळ काढणे आणि जलसंधारणाची विविध कामे व बंधारे बांधण्याचे मोठे प्रकल्प 'नाम' फाउंडेशनच्या माध्यमातून राबवले. शेतकरी कुटुंबातील गरीब मुलींच्या विवाहासाठी आर्थिक हातभार लावणे तसेच आत्महत्याग्रस्त कुटुंबातील मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी उचलणे ही कामे केली. बिहारमधील पूरग्रस्तांच्या मदतीसाठी 'अनुभूती' या संस्थेद्वारे निधी दिला. तसेच 'पाठशाला या चित्रपटाचे मानधन आणि राज कपूर पुरस्काराची १० लाख रुपयांची संपूर्ण रक्कम त्यांनी महाराष्ट्रातील दुष्काळ निवारणासाठी दान केली. ते आपल्या मिळकतीचा मोठा वाटा सामाजिक कार्यासाठी व मदतीसाठी वापरत असत.

-७४९८८८५०६१

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# महावितरणच्या भरारी पथकांचा मोठा दणका: विदर्भात ६ महिन्यांत २१.३६ कोटींची वीजचोरी उघड

## १११ ग्राहकांवर गुन्हे दाखल

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
महावितरणच्या नागपूर प्रादेशिक विभागाअंतर्गत कार्यरत सुरक्षा व अंमलबजावणी विभागा अंतर्गत असलेल्या भरारी पथकांनी वीजचोरी आणि अनधिकृत वापरा विरोधात धडक कारवाई मोहीम राबवत अवघ्या सहा महिन्यांत (एप्रिल ते सप्टेंबर २०२६) तब्बल २१.३६ कोटी रुपयांचे वीजचोरी व अनियमिततेचे गैरप्रकार उघडकीस आणले आहेत. नागपूर परिक्षेत्रातील भरारी पथकांनी संपुर्ण विदर्भात ५,१५१ वीज जोडण्यांची सखोल तपासणी करून ही मोठी कामगिरी बजावली आहे.

या मोहिमेदरम्यान १३११ ग्राहकांकडून विद्युत कायदा २००३ च्या कलम १३५ अन्वये १४.८५ कोटी रुपयांची थेट वीजचोरी पकडण्यात आली आहे. तर कलम १२६ व इतर ४८१ प्रकरणांखाली ६.५० कोटी रुपयांची अनियमितता आढळली आहे. महावितरणच्या पथकांनी या कारवाईनंतर प्रभावी वसुली मोहीम राबवून निर्धारणापैकी तब्बल १५.८३ कोटी रुपयांची रक्कम वसूल करण्यात यश मिळवले आहे. तसेच वीजचोरीची रक्कम न भरणाऱ्या १११ ग्राहकांवर विविध पोलीस ठाण्यांमध्ये थेट गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

विभागाच्या या मोहिमेचा मंडलनिहाय आढावा पाहता अकोला ३२७.३० लाख (वसुली १८३.४८ लाख), अमरावती १८५.५६ लाख (वसुली १६९.६३ लाख), बुलढाणा ११८.३१ लाख (वसुली ९६.१ लाख), भंडारा १५६.६० लाख (वसुली १३२.२८ लाख), चंद्रपूर १४५.३९ लाख (वसुली ९६.५४ लाख), नागपूर शहर २१३.८० लाख (वसुली १८५.५५ लाख), नागपूर ग्रामीण १२७.५९ लाख (वसुली ७१.३७ लाख), वर्धा ९६.८२ लाख (वसुली ४३.८९ लाख), यवतमाळ ११२.३७ लाख (वसुली ९२.५२ लाख), गोंदिया १००.४० लाख (वसुली ७४.३४ लाख), गडचिरोली ७६.१२ लाख (वसुली ६६.९० लाख) आणि वाशीम जिल्ह्यात २४३.३६ लाख (वसुली १९७.१९ लाख) रुपयांचे निर्धारण करण्यात आले. याशिवाय अकोला शहर, अमरावती शहर व नागपूर सिव्हिल लाईन्स या विभागांतूनही २३३.२१लाखांचे निर्धारण करून १७३.३३ लाखांची वसुली करण्यात आली आहे.

महावितरणचे व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्रा, कार्यकारी संचालक (सुरक्षा व अंमलबजावणी) अपर्णा गिते (म.पो.से.) आणि नागपूर परिक्षेत्राचे उपसंचालक सुनील थापेकर यांच्या नेतृत्वाखाली विदर्भात मंडळ स्तरावर १२ विशेष भरारी पथके आणि विभागीय स्तरावर ३ भरारी पथके तैनात करण्यात आली आहेत. याशिवाय, नागपूर आणि अकोला येथे सुरक्षा व अंमलबजावणी परिमंडळ कार्यालये कार्यरत आहेत. वीजचोरी हा गंभीर सामाजिक व कायदेशीर अपराध असल्याने नागरिकांनी अधिकृत वीज जोडणी घेऊनच वीज वापरावी, असे आवाहन महावितरणने केले आहे. तसेच परिसरात वीजचोरी आढळल्यास त्याची गोपनीय माहिती देणाऱ्या नागरिकाचे नाव गुप्त ठेवून त्यास महावितरणतर्फे योग्य ते बक्षीस दिले जाईल.

**विभागनिहाय भरारी पथकांचे सक्षमीकरण:** विभागनिहाय भरारी पथकांचा अधिक प्रभावी व गतिमान पद्धतीने वापर करण्यासाठी या पथकांमधील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीचे आदेश नुकतेच जारी करण्यात आले आहेत. यानुसार नागपुर परिमंडलांतर्गत असलेल्या प्रत्येक विभागात ही भरारी पथके कार्यरत करण्यात आलि अहे. महावितरणचे हे विशेष पथक वीजचोरीच्या आधुनिक व क्लिष्ट प्रकारांवर बारीक लक्ष ठेवून कारवाई तीव्र करणार आहे.

ही भरारी पथके वीज मीटरमधील फेरफार, सीटी व पीटी मधील छेडछाड, इलेक्ट्रॉनिक बायपास, थेट वीज जोडणी तसेच अनधिकृत वीज वापराशी संबंधित इतर सर्व गंभीर अनियमितता शोधून काढणार आहेत.

## ६१ वर्षीय वृद्धाचा मृत्यू

**नाशिक :** नाशिक शहरात महापालिका आणि कंत्राटदाराच्या निष्काळजीपणाचा गंभीर आणि दुर्दैवी प्रकार समोर आला आहे. रस्त्यासाठी खणून ठेवलेल्या खड्ड्याचा अंदाज न आल्याने दुचाकी खड्ड्यात कोसळून प्रकाश वंडेशकर (वय ६१) या वृद्धाचा दुर्दैवी मृत्यू झाला. ही भीषण दुर्घटना राजीवनगर परिसरात घडली. या घटनेमुळे संपूर्ण शहरातून संताप व्यक्त केला जात आहे.मिळालेल्या माहितीनुसार, प्रकाश वंडेशकर हे गुरुवारी कलानगरकडून राजीवनगरच्या दिशेने आपल्या दुचाकीवरून जात होते. दरम्यान, राजीवनगर परिसरात रस्त्याचे काम सुरू होते.

## प्रकाश हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजमध्ये निबंध स्पर्धेचे आयोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, कांद्री**
महात्मा ज्योतिबा फुले यांच्या शैक्षणिक आणि सामाजिक कार्यावरील निबंध स्पर्धेचें आयोजन उमा ज्योती स्मृती फाउंडेशन, कांद्री मेन आणि इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन फॉर द डेव्हलपमेंट ऑफ रुरल पुअर, नवी दिल्ली द्वारे चालवल्या जाणाऱ्या प्रकाश हायस्कूल आणि ज्युनियर कॉलेज, कांद्री मेन येथे महात्मा ज्योतिबा फुले यांच्या शैक्षणिक आणि सामाजिक कार्यावरील निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या निबंध स्पधेर्चे आयोजन



उमा ज्योती स्मृती फाउंडेशन, कांद्री मेआणि इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन फॉर द डेव्हलपमेंट ऑफ रुरल पुअर, नवी दिल्ली द्वारे संयुक्त विद्यमाने करण्यात आले.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्रकाश हायस्कूल आणि ज्युनियर कॉलेजचे प्राचार्य मिलिंद वानखेडे होते. प्रमुख अतिथी म्हणुन हाऊसिंग बँकेचे माजी संचालक (अतिरिक्त) डॉ. गोवर्धन नामदेव सोमदेव, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया चंदीगडचे उपमहाव्यवस्थापक विजयकुमार सोमदेव आणि शिक्षक अशोक नटकर हे उपस्थित होते.

यावेळी विजयकुमार सोमदेव यांनी विद्यार्थ्यांना रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या कार्याबद्दल मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी निबंध स्पर्धेत उत्साहाने सहभाग नोंदवला आणि आपल्या लेखन मंडळातून महात्मा ज्योतिबा फुले यांच्या शैक्षणिक आणि सामाजिक कार्याचा व्यावहारिक आढावा सादर केला. याप्रसंगी स्पर्धेतील प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते व प्राचार्य मिलिंद वानखेडे यांच्या हस्ते निबंध स्पर्धेत उल्लेखनीय भाग घेणाऱ्या अक्षरा वरखेडे, लक्ष्मी उईके, रोशनीबेन, गरिमा पाकरा, जय वरखेडे, अष्टांग घरडे, श्रावणी नेवारे, हिमांशू नेवारे यांच्यासह एकूण ११ विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमाचे समन्वय कामिनी पाटील यांच्या 'बनानास' आणि प्रशांत सर्पटे यांच्या 'बनानास' या उपक्रमाद्वारे कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि महान व्यक्तींच्या विचारांना ओळख देण्यासाठी, या उद्देशाने आयोजित केलेल्या कार्यक्रमांबद्दल किंवा उपक्रमांबद्दल विद्यार्थ्यांमध्ये उत्सुकता होती. कार्यक्रमाला सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## नक्षी येथे महाआरोग्य शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

### ५०० ते ६०० नागरिकांची आरोग्य तपासणी; १०० जणांच्या मोतीबिंदू शस्त्रक्रिया होणार



**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**
ग्रामीण भागातील नागरिकांना तज्ज्ञ वैद्यकीय सेवा उपलब्ध व्हावी, या उद्देशाने नक्षी येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज सभागृहात गुरुवारी निःशुल्क महाआरोग्य रोगनिदान, शस्त्रक्रिया नोंदणी व रक्तदान शिबिर घेण्यात आले. सुधीर पारवे फाउंडेशन, लक्ष्मणा बहुउद्देशीय संस्था, भिवापूर आणि शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबिर आयोजित करण्यात आले होते.

माजी आमदार सुधीर पारवे, रोहित पारवे, नक्षीचे सरपंच अनिकेत वराडे, कृषी उत्पन्न बाजार समिती उमरेडचे सभापती रुपचंद कडू आणि पत्रकार शरद मिरे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी सुधीर पारवे यांनी संस्थेच्या माध्यमातून नागपूर जिल्ह्यातील ग्रामपंचायत स्तरावर आरोग्य शिबिरे आयोजित करून नागरिकांना आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याचा मानस व्यक्त केला. शिबिरात पंचक्रोशीतील सुमारे ५०० ते ६०० नागरिकांनी विविध आरोग्य तपासण्यांसाठी नोंदणी केली. नेत्ररोग, बालरोग, नाक-कान-घसा, अस्थिरोग, त्वचारोग, श्वसनविकार यासह विविध आजारांची तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी करण्यात आली. तसेच विविध शस्त्रक्रियांसाठी पात्र रुग्णांची नोंदणी करून पुढील उपचारांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. दरम्यान, मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी १०० रुग्णांची नोंदणी करण्यात आली असून त्यांच्यावर नागपूर येथील शालिनीताई मेघे रुग्णालयात शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. ग्रामीण भागातच प्राथमिक तपासणी आणि पुढील उपचारांची नोंदणी उपलब्ध झाल्याने नागरिकांना दिलासा मिळाला.

शिबिराच्या आयोजनासाठी मिथुन माटे, हिमांशू अग्रवाल, ज्ञानेश्वर वराडे, प्रमोद राऊत, राऊत मॅडम, बाबुराव गवळी यांच्यासह आरोग्य विभागाचे अधिकारी-कर्मचारी, आशा सेविका, अंगणवाडी सेविका, स्वयंसेवक यांनी सहकार्य केले. शिबिराला नागरिकांची मोठी उपस्थिती होती.

## मल्हारपुरात विवाहितेची आत्महत्या, 'त्याच' खोलीतील दुसरी घटना?

### पतीचे हे दुसरे लग्न; पहिल्या पत्नीनेही आत्महत्या केल्याची चर्चा, प्रकरणाने घेतले वेगळे वळण

**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**
तालुक्यातील मल्हारपूर येथे २६ वर्षीय विवाहितेने घरातील स्वयंपाक खोलीतील लोखंडी अँगलला ओढणीच्या साहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना बुधवारी (७ ऑक्टोबर) सायंकाळी उघडकीस आली. पल्लवी सुनील वराडे असे मृत महिलेचे नाव आहे. पल्लवीला फिटचा आजार असल्याची माहिती असून, प्रकृतीच्या त्रासातून तिने हे टोकाचे पाऊल उचलले असावे, असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. मात्र, आत्महत्येचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

घटनेच्या वेळी पल्लवीचा पती सुनील आणि सासू मंदाबाई हे शेतात गेले होते. पल्लवी आणि तिचा अडीच वर्षांचा मुलगा अयांश हे दोघे घरी होते. सायंकाळी सुनील व मंदाबाई घरी परतल्यानंतर घराचा दरवाजा आतून बंद असल्याचे आढळले. आवाज देऊनही प्रतिसाद न मिळाल्याने सुनीलने घराच्या मागील बाजूने प्रवेश केला. त्यावेळी पल्लवी गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आली. तिला खाली उतरविल्यानंतर तिचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले.

दरम्यान, या घटनेमुळे परिसरात वेगळीच चर्चा सुरू झाली आहे. सुनीलचे हे दुसरे लग्न असून, त्याच्या पहिल्या पत्नीनेही लग्नानंतर काही महिन्यांत आत्महत्या केल्याची चर्चा आहे. त्यानंतर सुनीलने पल्लवीसोबत दुसरा संसार थाटला होता. प्रकृतीच्या कारणास्तव पल्लवी काही काळ माहेरी होती आणि सुमारे सात-आठ महिन्यांपूर्वी ती मल्हारपूर येथे सासरी परतल्याचे सांगितले जाते.

विशेष म्हणजे, पल्लवीने ज्या खोलीत आत्महत्या केल्याचे सांगितले जात आहे, त्याच खोलीत यापूर्वी सुनीलच्या पहिल्या पत्नीनेही आत्महत्या केली होती, अशी चर्चा परिसरात आहे. त्यामुळे हा केवळ दुर्दैवी योगायोग आहे की या दोन्ही घटनांमागे काही अन्य कारण आहे, याबाबत तर्कवितर्कांना उधाण आले आहे. मात्र, या चर्चेची अधिकृत पुष्टी झालेली नसून, दोन्ही घटनांमधील संबंधाबाबत निष्कर्ष काढण्यासाठी पोलिस तपास महत्त्वाचा ठरणार आहे.

दरम्यान, भिवापूर पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी ग्रामीण रुग्णालयात पाठविला. याप्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. ठाणेदार अजितसिंग देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सचिन उरकुडे पुढील तपास करीत आहेत. पल्लवीच्या आत्महत्येमागील नेमके कारण तसेच या घटनेशी संबंधित इतर बाबी तपासातून स्पष्ट होणार आहेत.

## मराठी अभिजात भाषा गौरव दिनानिमित्त तिसरे बांधिलकी ऑनलाइन कविसंमेलन उत्साहात

**दै. सिंहवाणी वृत्त, अमरावती**
मराठी अभिजात भाषा गौरव दिनानिमित्त बांधिलकी प्रतिष्ठान तसेच बांधिलकी बहुउद्देशीय ट्रस्ट, अमरावती यांच्या वतीने तिसरे बांधिलकी ऑनलाइन कविसंमेलन नुकतेच बुधवार दिनांक ०७ ऑक्टोबर २०२६ उत्साहात आयोजित करण्यात आले.

या कविसंमेलनाच्या अध्यक्षस्थानी युवा कादंबरीकार तथा सुप्रसिद्ध







वऱ्हाडी साहित्यिक प्रा. पुष्पराज गावंडे (अकोला) होते. सुप्रसिद्ध साहित्यिक तथा पेन प्रकाशन, पुणेचे प्रकाशक देवा झिंझाड यांच्या हस्ते कविसंमेलनाचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून सुप्रसिद्ध साहित्यिक प्रा. डॉ. रेखा जगनाळे (नागपूर) तसेच सुप्रसिद्ध साहित्यिक आणि बोलीभाषा साहित्य संस्था, अकोलाचे अध्यक्ष प्रा. महादेव लुले उपस्थित होते.

मराठी भाषेच्या अभिजात दर्जाचा गौरव आणि मराठी साहित्याच्या विविध प्रवाहांना व्यासपीठ मिळवून देण्याच्या उद्देशाने आयोजित या कविसंमेलनात निमंत्रित कवींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आपल्या कविता सादर केल्या. विविध विषय, आशय आणि काव्यप्रकारांनी रंगलेल्या या ऑनलाइन कविसंमेलनाला साहित्यप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक बांधिलकी समुहाच्या संस्थापक अध्यक्ष डॉ. नीता कचवे यांनी केले. संमेलनाचे प्रभावी असे सूत्रसंचालन नागपुरचे प्रसिद्ध युवा कवी हितेश गोमासे यांनी तर आभार राहुल गवस यांनी मानले. कार्यक्रमाच्या माध्यमातून मराठी भाषा, साहित्य आणि बोलीभाषांच्या संवर्धनासाठी साहित्यिकांनी योगदान देण्याचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल बांधिलकी प्रतिष्ठान व बांधिलकी बहुउद्देशीय ट्रस्टचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात आले.

या संमेलनाला रसिक श्रोता म्हणून प्रसिद्ध युवा गझलकार गोपाल मापारी,तर विजय वासाडे, भगवान कानडजे पाटील यांच्या सोबतच उपस्थिती ३५ कवींच्या सुंदर सादरीकरनाने संमेलणाची रंगत वाढवली.

## थोडक्यात

### एकात्मिक बाल विकास प्रकल्प खेड फुरूस बीट अंतर्गत पोषण महा सेवा संकल्प अभियान, २०२६ उत्साहात साजरा



**दै. सिंहवाणी वृत्त, खेड**
एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प खेड फूरुस बीट अंतर्गत दस्तुरी सह्याद्री हायस्कूलमध्ये पोषण महा तसेच सेवा संकल्प अभियान, २०२६ हा कार्यक्रम नुकताच मोठ्या उत्साहात पार पडला. सदर कार्यक्रमासाठी महिला व बालकल्याण सभापती मयुरी शिर्के, त्याचप्रमाणे जिल्हा परिषद सदस्य अजय बिरवटकर, पंचायत समिती सदस्य संग्राम कदम, अपूर्वा जाधव, एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी दीपाली शिरीषकर, पर्यवेक्षिका देवता काटकर, दस्तुरी सह्याद्री हायस्कूलचे मुख्याध्यापक प्रदीप घाणेकर तसेच बहुसंख्येने पालक विद्यार्थी हजर होते. ICDS सेवा निवृत्त कनिष्ट सहकारी सुप्रिया सावंत यांचा सत्कार करण्यात आला. सेवा निवृत्त पर्यवेक्षिका शोभा सावंत या ही उपस्थित होत्या.

सदर कार्यक्रमात विविध पाककृती मांडण्यात आल्या होत्या, तसेच विविध योजनांचे स्टॉल्स ठेवण्यात आले होते, त्याचप्रमाणे भव्य रांगोळ्यामधून विविध योजना मांडण्यात आल्या होत्या. विद्यार्थ्यांनी चित्रकला स्पर्धेमधून विविध पोषणाबाबत चित्रे साकारण्यात आली होती, फळ सजावट, THR च्या विविध पाककृती मांडण्यात आल्या होत्या. कार्यक्रमाचे विशेष म्हणजे पोषण परीने सर्वांचे लक्ष वेधले. सदर कार्यक्रमात सेवा संकल्प अभियान अंतर्गत विविध योजनांचे प्रत्यक्ष लाभ देऊन आशिवार्दाचे दिवे लावण्यात आले. प्रारंभ फाऊंडेशनच्या शिल्पा शिंदे उपस्थित होत्या. या फाऊंडेशन टीम एच आर रेसीपीसाठी बक्षीसे देण्यात आली. सर्वांनी कामात योगदान दिले. अंगणवाडी सेविका मदतनीस यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी खूप मोलाचे सहकार्य केले.

### निलज (खंडाळा)येथे नवयुवक मस्कऱ्या गणेश उत्सव मंडळातर्फे शनिवारला विसर्जन

**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा**
नवयुवक मस्कऱ्या गणेश उत्सव मंडळ निलज (खंडाळा) येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही विविध धार्मिक, सांस्कृतिक व



मनोरंजनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करून मस्कऱ्या गणेशोत्सव शांततेत साजरा करण्यात येत आहे. आज गुरुवार (ता. ८ ऑक्टोबर) ला महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. शनिवार (ता. १० ऑक्टोबर)ला विसर्जन करण्यात येणार आहे, असे मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी उत्सव ठिकाणी भेट दिली असता सांगितले.

यशस्वीतेसाठी मंडळाचे अध्यक्ष कैलास श्रावण चकोले, उपाध्यक्ष श्रीकांत सतपाल चकोले, सचिव गणेश उपासराव चकोले, सदस्यगण रोशन चिंधु चकोले, संदीप शंकर बाभरे, धीरज धर्मराज पाहुणे, युगांत संजय चकोले, पंकज देवचंद कारेमोरे, प्रभाकर मारोतराव चकोले, पवन शंकर चकोले, रामा गोमा शेंडे, राकेश भागवत चकोले, ग्रामपंचायत सदस्य धनराज नारायण चकोले , पुजारी रामचंद्र रुपराव चकोले परिश्रम घेत असून समस्त ग्रामवासी सहकार्य करत आहे.

### सालवा येथे मस्कऱ्या गणेश उत्सव

**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा**
नवयुवक गणेश मंडळ सालवा तर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही मस्कऱ्या गणेश उत्सव विविध सांस्कृतिक, धार्मिक व मनोरंजनात्मक



कार्यक्रमाचे आयोजन करून शांततेत साजरा करण्यात येत आहे.

यशस्वीतेसाठी मंडळाचे अध्यक्ष संकेत पाटील,उपाध्यक्ष अमोल वाटकर, सचिव अभिजीत वकलकार,सदस्यगण नंदेश कारेमोरे, मनोज पाटील,विशाल वकलकार,सुमित पाटील, भुषण वंजारी, वंश सोनवाने, वेदांत कारेमोरे, कुणाल चौधरी, प्रफुल चौधरी, प्रज्वल पाटील, अनिकेत कारेमोरे,अभिषेक भांदकर, नमिश कारेमोरे,पजू पाटील, आयुष कारेमोरे, कुणाल कारेमोरे, निखिल कारेमोरे, मंगेश वैध, सूर्या पाटील, अभय सोनवाने, शौर्य गायधने, आकाश शेंडे, अतुल वंजारी, महेश किरपाणे, खोमलाल डहरिया, दयालु डहरिया, अभिषेक शेंडे, अंकित पाटील, अक्षय कारेमोरे, सुधाकर सोनवाने, दिगाबर वंजारी परिश्रम घेत असून समस्त गावकरी मंडळी सहकार्य करत आहे.

### मल्हारपुरात विवाहितेची गळफास घेऊन आत्महत्या, आत्महत्येचे कारण अस्पष्ट

**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**
तालुक्यातील मल्हारपूर येथे पल्लवी सुनील वराडे (२६) या विवाहितेने घरातील स्वयंपाक खोलीतील लोखंडी अँगलला ओढणीच्या साहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना बुधवारी (७ ऑक्टोबर) सायंकाळी उघडकीस आली. बुधवारी पल्लवीचा पती सुनील व सासू मंदाबाई हे दोघे शेतात गेले होते. घरी पल्लवी आणि तिचा अडीच वर्षांचा मुलगा अयांश हे दोघेच होते. सायंकाळी सुनील व मंदाबाई घरी परतल्यानंतर घराचा दरवाजा आतून बंद असल्याचे आढळले. आवाज देऊनही प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे सुनीलने मागील बाजूने घरात प्रवेश केला असता पल्लवी गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसून आली. तिला खाली उतरविले असता तिचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले.

पल्लवीला फिटचा आजार असल्याची माहिती असून, या आजारामुळे तिने हे टोकाचे पाऊल उचलले असावे, असा प्राथमिक अंदाज व्यक्त होत आहे. मात्र, तिच्या आत्महत्येचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी भिवापूर ग्रामीण रुग्णालयात पाठविला. याप्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. ठाणेदार अजितसिंग देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सचिन उरकुडे पुढील तपास करीत आहेत.

थोडक्यात

## गीता बावनकुळे यांचे निधन

**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा**



कोदामेंढी येथील वार्ड क्र. २ च्या रहिवासी गिता सुधाकर बावनकुळे (५८) यांचे आज गुरुवार(ता. ८ ऑक्टोंबर) ला सकाळी ८:१५ वाजता दरम्यान अल्प आजाराने निधन झाले . त्यांच्यावर स्थानिक सुर नदीच्या दहन घाटावर सायं. ४ वाजेच्या दरम्यान अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पती, एक मुलगा, तीन मुली, सून, जावई,नातवंडे व बराच मोठा आप्त परिवार आहे. त्या येथील युवा सामाजिक कार्यकर्ते भूमेश सुधाकर बावनकुळे यांच्या आई व परमात्मा एक सेवक मंडळाचे जेष्ठ कार्यकर्ते सुधाकर बावनकुळे यांच्या पत्नी होत.

## १९४९ पूर्वीच्या आदिवासी पुराव्यांची पडताळणी करून न्याय द्या, शुभम परतेती यांची मागणी

**मध्यप्रदेशातील ऐतिहासिक अभिलेखांची घेतली माहिती**

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महाराष्ट्र प्रदेश आदिवासी युवक काँग्रेसचे नागपूर ग्रामीण अध्यक्ष शुभम परतेती यांनी मध्यप्रदेशातील छिंदवाडा, सिवनी, बालाघाट



आणि बैतूल जिल्हाधिकारी कार्यालयांना भेट देऊन मध्यप्रांत व बेरार काळातील जुन्या शासकीय अभिलेखांसह १९४९ पूर्वीच्या व १९४९ सालच्या पुराव्यांच्या उपलब्धतेबाबत माहिती घेतली. महाराष्ट्र निर्मितीपूर्वीच्या मध्यप्रांत व बेरार काळातील अनेक अधिकृत शासकीय नोंदी व कागदपत्रे आजही आदिवासी कुटुंबांकडे उपलब्ध आहेत. त्यामुळे अशा ऐतिहासिक पुराव्यांचा जात वैधता प्रक्रियेत वस्तुनिष्ठ व कायद्यानुसार विचार होणे आवश्यक आहे, अशी भूमिका परतेती यांनी व्यक्त केली. छिंदवाडा, बैतूल, बालाघाट, सिवनी, बैहर, चांदा, सिरोंचा, गडचिरोली आणि मेलघाट आदी ऐतिहासिक प्रदेशांशी संबंधित जुन्या दस्तऐवजांची पडताळणी करताना त्या काळातील प्रशासकीय सीमा तसेच ६ सप्टेंबर १९५० च्या संविधानातील अनुसूचित जमातींबाबतच्या राष्ट्रपती आदेशाचा विचार करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

ऐतिहासिक व अधिकृत पुरावे उपलब्ध असतानाही पात्र आदिवासींना केवळ प्रशासकीय किंवा ऐतिहासिक नोंदींच्या चुकीच्या अर्थामुळे त्यांच्या हक्कापासून वंचित ठेवू नये. महाराष्ट्र शासन, अनुसूचित जमाती जात पडताळणी समित्या आणि संबंधित प्रशासनाने १९४९ पूर्वीच्या व १९४९ सालच्या पुराव्यांची पारदर्शकपणे पडताळणी करून पात्र आदिवासींना न्याय द्यावा, अशी मागणी शुभम परतेती यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली.

## मैदानी खेळात एस . के . पोरवाल कनिष्ठ महाविद्यालययाचा डंका, १४ विद्यार्थ्यांची जिल्हास्तरावर निवड



**दै. सिंहवाणी वृत्त, कामठी**

सेठ केसरीमल पोरवाल कनिष्ठ महाविद्यालयाच्या १४ विद्यार्थ्यांची जिल्हा स्तरीय मैदानी क्रीडा स्पर्धेकरिता निवड झाली. या स्तरीय मैदानी क्रीडा स्पर्धा या दिनांक ३०/०९/२०२६ ला राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ सिंथेटिक ट्रॅक रवी नगर नागपूर येथे घेण्यात आल्या. यामध्ये कामठी तालुक्यातील सर्व कनिष्ठ महाविद्यालयाच्या खेळाडूंनी स्पर्धामध्ये भाग घेतला होता त्यामध्ये वयोगट १९ मध्ये एस के पोरवालचे विद्यार्थी वैभव प्रजापती १०० मीटर दोन फर्स्ट २०० मीटर दोड फर्स्ट आणि रिले मध्ये फर्स्ट. आयुष बारगड १५०० मीटर प्रथम, दक्ष फुले २०० मीटर द्वितीय रीले मध्ये प्रथम, सक्षम बैसाने ४०० मीटर द्वितीय, आयुष जुमडे १०० मीटर द्वितीय ११० हरडल प्रथम तसेच रिले प्रथम, उबेद खान ४०० मीटर प्रथम रिले प्रथम, नीट पजे पंधराशे मीटर द्वितीय,८०० मीटर द्वितीय, पाच किलोमीटर वॉक प्रथम, जिया उल हसन थाळीफेक मध्ये प्रथम, तहसीम रजा लांब उडी मध्ये प्रथम त्यानंतर वयोगट १७ मुलांमध्ये मध्ये अजिंक्य रामटेके ४०० मीटर प्रथम, ८०० मीटर प्रथम ,१५०० मीटर प्रथम, राहुल सूर्यवंशी १०० मीटर प्रथम ४०० मीटर द्वितीय त्यानंतर वयोगट १७ मुलींमध्ये अग्रजा बोरकर गोळा फेक प्रथम, हर्षिका सीरिया गोळा फेक द्वितीय ,२०० मीटर द्वितीय, , नंदिनी ओमटे ८०० मीटर द्वितीय ३००० मध्ये प्रथम एकूण १४ विद्यार्थ्यांनी प्रथम आणि द्वितीय स्थानावर अजिंक्य राहिले. या विद्यार्थ्यांना कॉलेजच्या प्राध्यापिका डॉ.मल्लिका नागपुरे यांचे मार्गदर्शन लाभले.सर्व विजेता विद्यार्थ्यांचे अभिनंदन कॉलेजचे प्राचार्य डॉ स्वप्नील दाहात सर उपप्राचार्य वंजारी सर पर्यवेक्षक मेंढे सर तसेच कॉलेज चेसर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे केले आहे.

## हवाई प्रवाशांना मोठा फटका

**मुंबई** : सणासुदीच्या काळात विमानाने प्रवास करणाऱ्यांना महागाईचा फटका बसणार आहे. कारण देशातील प्रमुख विमान कंपन्यांनी विमान भाड्यावरील इंधन अधिभारात वाढ जाहीर केली आहे. दोन दिवसांपूर्वी इंडिगोने इंधन अधिभार वाढवला. आता एअर इंडिया, एअर इंडिया एक्सप्रेस आणि अकासा एअरनेही इंधन अधिभार वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. एव्हिएशन टर्बाइन फ्युएलच्या (एटीएफ) किमतीत सातत्याने होणाऱ्या वाढीच्या पार्श्वभूमीवर कंपन्यांनी हा निर्णय घेतला आहे. हे नवीन दर ९ ऑक्टोबरपासून लागू होतील आणि त्याचा प्रवाशांच्या एकूण विमान भाड्यावर निश्चितच परिणाम होईल.कंपन्यांच्या मते, भू-राजकीय घडामोडी आणि जागतिक ऊर्जा बाजारावरील दबावामुळे गेल्या काही महिन्यांत एटीएफच्या (अळऋ) किमतींमध्ये चढ-उतार झाला आहे. या अलीकडील दरवाढीमुळे विमान कंपन्यांचा खर्च वाढला आहे.

# मांडोदेवीत मातेचा जयघोष घुमणार; नवरात्रोत्सवाची तयारी अंतिम टप्प्यात

**घटस्थापनेला २१०० महाज्योती प्रज्वलित होणार, भाविकांच्या सोयीसाठी दर्शन, वाहतूक, पाणी व वीज व्यवस्थेवर विशेष भर**

**दै. सिंहवाणी वृत्त, गोंदिया**

शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त आमगाव तालुक्यातील बघेडा-तेढा परिसरातील सूर्यादेव मांडोदेवी देवस्थान येथे तयारीला वेग आला आहे. ११ ऑक्टोबरपासून सुरू होणाऱ्या नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर देवस्थान संस्थेच्या वतीने विविध व्यवस्था अंतिम टप्प्यात आणण्यात येत आहेत. यासंदर्भात शनिवार, ३ ऑक्टोबर रोजी देवस्थान संस्थेचे अध्यक्ष तथा गोंदियाचे आमदार विनोद अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली पदाधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली.

या बैठकीत नवरात्रोत्सवा दरम्यान मोठ्या संख्येने दाखल होणाऱ्या भाविकांच्या सोयीसुविधांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. घटस्थापना, महाज्योत व्यवस्था, महाप्रसाद, दर्शनव्यवस्था, वाहतूक नियंत्रण, पाणीपुरवठा आणि वीजपुरवठा यासह विविध बाबींचा आढावा घेण्यात आला. सर्व व्यवस्था वेळेत आणि सुरळीत पूर्ण करून नवरात्रोत्सव भक्तिमय व शांततापूर्ण वातावरणात पार पाडण्याच्या सूचना आमदार



विनोद अग्रवाल यांनी दिल्या.

**घटस्थापनेला २१०० महाज्योतींची रोषणाई**

मांडोदेवी देवस्थानातील घटस्थापना हा नवरात्रोत्सवातील प्रमुख आकर्षणाचा भाग असतो. यंदा घटस्थापनेच्या निमित्ताने सुमारे २१०० महाज्योती प्रज्वलित करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. नवरात्रोत्सवाच्या काळात मोठ्या संख्येने भाविक देवीसमोर महाज्योत प्रज्वलित करतात. त्यामुळे संपूर्ण देवस्थान परिसर भक्ती आणि श्रद्धेच्या प्रकाशाने उजळून निघणार आहे. महाज्योत प्रज्वलित करण्यासाठी भाविकांना कोणतीही अडचण निर्माण होऊ नये, यासाठी देवस्थान संस्थेकडून आवश्यक नियोजन करण्यात येत आहे.

**मध्य विदर्भातील प्रमुख धार्मिक व पर्यटनस्थळ**

गोंदिया जिल्हा मुख्यालयापासून सुमारे ३० किलोमीटर अंतरावर, नैसर्गिक वनसंपदेने वेढलेल्या डोंगररांगांच्या शिखरावर स्वयंभू माँ मांडोदेवीचे देवस्थान आहे. मध्य विदर्भातील प्रमुख धार्मिक आणि पर्यटनस्थळ म्हणून या देवस्थानाची ओळख आहे. वर्षभर येथे भाविकांची वर्दळ असते. मात्र चैत्र नवरात्र आणि शारदीय नवरात्रोत्सवाच्या काळात भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढते. गोंदिया जिल्ह्यासह भंडारा, गडचिरोली, चंद्रपूर तसेच मध्य प्रदेशातील बालाघाट जिल्ह्यातूनही मोठ्या संख्येने भाविक मांडोदेवीच्या दर्शनासाठी येतात. श्रद्धेने देवीसमोर नतमस्तक होत भाविक मनोकामना पूर्ण होण्यासाठी प्रार्थना करतात.

**विविध मार्गांवर वाहतूक व्यवस्थेचे नियोजन**

मांडोदेवी देवस्थानापर्यंत पोहोचण्यासाठी भाविकांना विविध मार्ग उपलब्ध आहेत. कोहमारा-गोंदिया मार्गावर गोरेगावच्या पूर्वेस असलेल्या मुंडिपार येथून थेट मांडोदेवी देवस्थानाकडे जाता येते. तसेच आमगाव आणि देवरीकडूनही देवस्थानासाठी मार्ग उपलब्ध आहेत. नवरात्रोत्सवात विविध भागांतून येणाऱ्या भाविकांची मोठी गर्दी लक्षात घेता संबंधित मार्गांवरील वाहतूक सुरळीत ठेवणे, वाहनांची योग्य व्यवस्था करणे आणि भाविकांना सुरक्षितपणे देवस्थानापर्यंत पोहोचता यावे, यासाठी नियोजन करण्यात येत आहे.

**धार्मिक श्रद्धेसोबत सामाजिक समरसतेचेही केंद्र**

मांडोदेवी देवस्थानाची ओळख केवळ धार्मिक स्थळ म्हणून मर्यादित नसून सामाजिक समरसतेच्या उपक्रमांशीही जोडलेली आहे. देवस्थान परिसरातून सर्वजातीय सामूहिक विवाह उपक्रमाला सुरुवात झाल्याने या स्थळाला सामाजिक एकात्मतेचेही महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे धार्मिक श्रद्धेसोबत सामाजिक बांधिलकी जपणारे केंद्र म्हणून मांडोदेवी देवस्थानाची वेगळी ओळख निर्माण झाली आहे.

**भाविकांच्या सुविधांना प्राधान्य**

नवरात्रोत्सवातील संभाव्य गर्दी लक्षात घेऊन दर्शनव्यवस्था, वाहतूक नियंत्रण, पाणीपुरवठा, वीजपुरवठा, महाज्योत आणि महाप्रसाद यासह आवश्यक सुविधांची तयारी देवस्थान संस्थेकडून करण्यात येत आहे. भाविकांना दर्शन घेताना कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी सर्व व्यवस्था वेळेत पूर्ण करण्यावर भर देण्यात आला आहे. प्रत्येक भाविकाला सुलभ दर्शन, आवश्यक सुविधा आणि भक्तिमय वातावरण मिळावे तसेच संपूर्ण नवरात्रोत्सव शांततेत आणि सुव्यवस्थित पद्धतीने पार पडावा, हा देवस्थान संस्थेचा प्रयत्न आहे.

बैठकीला देवस्थान संस्थेचे अध्यक्ष तथा आमदार विनोद अग्रवाल, सचिव डॉ. लक्ष्मण भगत, उपाध्यक्ष भैय्यालाल सिंदराम, कोषाध्यक्ष विश्वनाथ असाटी, सहसचिव कुशनजी घासले, सदस्य डॉ. जितेंद्र मेंढे, शालिकराम उईके, सखाराम सिंदराम, दिलीप खंडेलवाल, राहुल अग्रवाल, नंदकिशोर गौतम, श्याम ब्राह्मणकर, छन्नू काठेवार तसेच मंदिराचे पुजारी पंडित अयोध्यादासजी महाराज उपस्थित होते.

## स्वच्छता गृहाअभावी महिलांची कुचंबणा : बल्लारपूरच्या व्यापारी संकुलांत सुविधेची मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर-धनंजय पांढरे**

बाजारपेठेत खरेदीसाठी येणाऱ्या नागरिकांसाठी मूलभूत सुविधांचा प्रश्न ऐरणीवर आला असून, शहरातील अनेक व्यापारी व व्यावसायिक संकुलांमध्ये स्वच्छतागृहांची पुरेशी व्यवस्था नसल्याने विशेषतः महिलांची मोठी गैरसोय होत आहे. कुठे स्वच्छतागृहच नाही, तर कुठे असलेली सुविधा अस्वच्छतेमुळे वापरण्यायोग्य राहिलेली नाही. या गंभीर समस्येकडे नगर परिषद प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन शहरातील सर्व व्यापारी संकुलांमध्ये महिला व पुरुषांसाठी स्वच्छतागृहांची व्यवस्था करावी, अशी मागणी वंचित बहुजन महिला आघाडीने केली आहे. यासंदर्भात ७ ऑक्टोबर रोजी बल्लारपूर नगर परिषदेला निवेदन देण्यात आले.



बालाजी कॉम्प्लेक्स, व्यंकटेश एम्पायर, अर्जुना कॉम्प्लेक्स यांसह नगर प्रशासनाच्या माहितीत असलेल्या इतर व्यापारी संकुलांमध्ये येत्या पंधरा दिवसांत स्वच्छतागृहांची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

शहरातील व्यापारी संकुलांमध्ये दररोज मोठ्या संख्येने नागरिक, महिला, ज्येष्ठ नागरिक, ग्राहक, व्यापारी आणि कर्मचारी ये-जा करतात. मात्र, स्वच्छतागृहांच्या अभावामुळे त्यांना अनेकदा गैरसोयीचा सामना करावा लागतो. उपलब्ध असलेल्या स्वच्छतागृहांची स्वच्छता व देखभाल योग्य पद्धतीने होत नसल्याने परिस्थिती आणखी गंभीर झाली आहे. सार्वजनिक ठिकाणी मूलभूत सुविधा असणे हा नागरिकांचा अधिकार असताना स्वच्छतागृहांसारख्या अत्यावश्यक सुविधेसाठी नागरिकांना त्रास सहन करावा लागत असल्याची खंत पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

विशेषतः महिलांसाठी ही समस्या अधिक संवेदनशील आहे. बाजारपेठेत किंवा व्यापारी संकुलात काही काळ थांबावे लागल्यास स्वच्छतागृह उपलब्ध नसल्याने महिलांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे महिला सन्मान आणि सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने या प्रश्नावर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली.

वंचित बहुजन महिला आघाडीच्या शहराध्यक्षा रेखाताई पागडे यांच्या नेतृत्वात निवेदन देण्यात आले. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे शहराध्यक्ष उमेश कडू उपस्थित होते. शहर महासचिव गौतम रामटेके, शहर संघटक राकेश पेटकर, पराग जांभुळकर, प्रकाश रामटेके, आयटी प्रमुख प्रियंकेश शिंगाडे, युवा तालुकाध्यक्ष अभिलाष चूनारकर, मनोज रघुवंशी, सूरज श्रृंगारे, आशाताई भाले, अनिता शंभरकर, संगीता मजगवळी, अनुकला वाघमारे, सुनील साठे, संदीप ताकसांडे, राकेश निमसटकर, राहुल डांगे, सुमित भाले, संघमित्रा दुर्योधन, श्रावस्ती खोब्रागडे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

शहरातील व्यापारी संकुलांमध्ये स्वच्छतागृहांची व्यवस्था करून त्यांची नियमित स्वच्छता व देखभाल सुनिश्चित करावी, तसेच यासाठी नगर परिषद प्रशासनाने ठोस पावले उचलावीत, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीने केली आहे.

## पेंच नदी पात्रात तरुणाचा मृतदेह आढळला

**दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी**

तालुक्यातील मौजा नेऊरवाडा येथील पेंच नदीच्या शिवारात बुधवारी ७ ऑक्टोबर रोजी एका ३७ वर्षीय तरुणाचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. या प्रकरणी पारशिवनी पोलीस ठाण्यात मर्ग दाखल करण्यात आला आहे.सचिन भिमराव गोडबोले वय ३७ वर्षे रा. कोदाडोंगरी, ता. सौंसर, जि. पांढुर्णा, म.प्र.) असे मृतकाची ओळख पटली.

विश्वसनीय सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी मृतकाची आई ममता भिमराव गोडबोले (वय ५२, रा. कोदाडोंगरी, ता. सौंसर, जि. पांढुर्णा, म.प्र.) यांनी पोलिसांना दिलेल्या बयाणात सांगितले की, त्यांचा मुलगा सचिन भिमराव गोडबोले हा दि. २ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता "मी आत्याच्या गावी नेऊरवाडा, ता. पारशिवनी जि.नागपूर येथे जात आहे" असे सांगून घरून निघून गेला होता. त्यानंतर दि. ७ ऑक्टोबर रोजी रात्री साडे नऊ वाजताच्या सुमारास मौजा नेऊरवाडा येथील पेंच नदी शिवारात पारशिवनी पासून १३ किमी उत्तरेस त्याचा मृतदेह आढळून आला.

मृतकाला दारू पिण्याची सवय होती. जास्त प्रमाणात दारूचे सेवन केल्यामुळे त्याचा मृत्यू झाला असावा, असा प्राथमिक अंदाज वर्तविण्यात येत आहे. आपल्या मुलाच्या मृत्यूबाबत कोणताही संशय नसल्याचे फिर्यादी आईने आपल्या बयाणात म्हटले आहे. फिर्यादीच्या तोंडी रिपोर्टवरून पोलिसांनी मर्ग कलम १९४ बी.एन.एस.एस. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणी पोहवा स्मिता मोहनकर यांनी मर्ग दाखल केला असून पुढील तपास एएसआय गंगाप्रसाद वरकडे हे करीत आहेत.

## अल निनोच्या सावटात चंद्रपूरच्या पाण्याचे नियोजन : १६ ऑक्टोबरपासून १० टक्के कपात

**दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर - धनंजय पांढरे**

अल निनोच्या संभाव्य प्रभावामुळे आगामी काळात पाणीटंचाईची परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन चंद्रपूर महानगरपालिका प्रशासनाने आतापासूनच पाणी व्यवस्थापनाला वेग दिला आहे. उपलब्ध जलसाठा अधिक काळ टिकवून ठेवण्यासाठी १६ ऑक्टोबरपासून किमान १० टक्के पाणी कपात करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्याचबरोबर पाणीगळती रोखणे, नळांना टोट्या बसविणे आणि औद्योगिक वापरासाठी पुनर्वापरित पाण्याचा वापर वाढविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.



चंद्रपूर शहरातील पाणीपुरवठ्याच्या नियोजनासाठी महानगरपालिकेत बुधवारी उच्चस्तरीय बैठक घेण्यात आली. जलसंपदा विभागाच्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने झालेल्या या बैठकीत शहराला उपलब्ध जलसाठा आणि भविष्यातील पाण्याची गरज यांचा आढावा घेण्यात आला.

संभाव्य टंचाईची परिस्थिती निर्माण झाल्यास नागरिकांना कमीतकमी अडचणींचा सामना करावा लागावा, यासाठी आतापासूनच नियोजन करण्यावर भर देण्यात आला.

बैठकीत उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करण्यासोबतच पाणी वितरण व्यवस्थेतील अपव्यय कमी करण्यावर चर्चा झाली. शहरातील पाणीगळतीची ठिकाणे शोधून तातडीने दुरुस्ती करण्याचे आदेश देण्यात आले. तसेच आवश्यकतेनुसार सर्व नळांना टोट्या बसविण्याची कार्यवाही करण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्या.

पाणी कपातीच्या निर्णयानुसार १६ ऑक्टोबरपासून किमान १० टक्के पाणी कमी प्रमाणात उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात येणार आहे. या कपातीची अंमलबजावणी कशा पद्धतीने करावी, त्याचा शहरातील पाणीपुरवठ्यावर काय परिणाम होईल आणि नागरिकांना कोणत्या पद्धतीने पाणी उपलब्ध करून द्यावे, याचा सविस्तर अहवाल तयार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

औद्योगिक क्षेत्रासाठी वापरल्या जाणाऱ्या पिण्याच्या पाण्यामुळे शहराच्या जलसाठ्यावर येणारा ताण कमी करण्यासाठी महानिर्मितीला पुनर्वापरित पाण्याचा वापर वाढविण्याच्या सूचना देण्यात आल्या. महानिर्मितीकडून वॉटर रिसायकलिंगचे काम सुरू असून पुनर्वापरित पाण्याचा वापर केला जात असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी बैठकीत दिली. दरम्यान, पाणी बचतीसाठी नागरिकांनीही पुढाकार घेण्याची गरज प्रशासनाने व्यक्त केली आहे. घरगुती वापरात पाण्याचा अनावश्यक अपव्यय टाळणे, नळ सुरू ठेवून पाणी वाया जाऊ न देणे आणि उपलब्ध पाण्याचा जपून वापर करणे, या बाबींकडे नागरिकांनी गांभीर्याने पाहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

शहरात पाणी बचतीबाबत व्यापक जनजागृती करण्याचेही नियोजन करण्यात आले आहे. शाळा-महाविद्यालये,सामाजिक संस्था आणि विविध जनजागृती कार्यक्रमांच्या माध्यमातून नागरिकांना पाणी बचतीचे महत्त्व पटवून देण्यात येणार आहे. या बैठकीला महानगरपालिका आयुक्तांसह चंद्रपूर पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता, महानिर्मितीचे उपमुख्य अभियंता व अधीक्षक अभियंता, मनपाचे शहर अभियंता, कार्यकारी अभियंता तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.

अल निनोच्या पार्श्वभूमीवर संभाव्य पाणीटंचाईचा सामना करण्यासाठी प्रशासनाने नियोजन सुरू केले असले तरी या प्रयत्नांना नागरिकांच्या सहकार्याची जोड मिळणे आवश्यक आहे. पाणीटंचाईचे संकट टाळण्यासाठी आजपासूनच पाण्याची बचत करण्याचे आवाहन मनपा प्रशासनाने केले आहे.

दैनिक
सिंहवाणी वृत्त

# अभिनयाचा युगपुरुष हरपला!



## बळीराजाचा आधारवड : नाना पाटेकर

**महाराष्ट्राच्या** कलासृष्टीतील एक तेजस्वी तारा नुकताच मावळला. ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांचे ८ ऑक्टोबर २०२६ रोजी गोव्यातील त्यांच्या निवासस्थानी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. पडद्यावरचा 'क्रांतिवीर' आणि 'नटसम्राट' जसा होता, तसाच तो खऱ्या आयुष्यातही होता. त्यांच्या निधनाने केवळ चित्रपटसृष्टीच नव्हे, तर महाराष्ट्रातील लाखो शेतकरी कुटुंबेही हळहळली आहेत. याचे कारण म्हणजे नाना पाटेकर यांनी २०१५ मध्ये सहकारी अभिनेते मकरंद अनासपुरे यांच्यासोबत स्थापन केलेली 'नाम फाउंडेशन' होय. या संस्थेने गेल्या एका दशकात दुष्काळग्रस्त आणि आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांच्या जीवनात आशादायी बदल घडवून आणले आहेत. २०१५ च्या एका संध्याकाळी नाना पाटेकर यांच्या आयुष्याला कलाटणी देणारी घटना घडली. त्यांनी चित्रपटसृष्टीतील यशस्वी कारकिदीर्नंतर स्वतःसाठी १.५ कोटी रुपयांची लग्झरी कार विकत घेण्याचे ठरवले होते. त्या रात्री दूरदर्शनावर महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त भागातील शेतकरी आत्महत्येची बातमी प्रसारित झाली. त्या बातमीत आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याच्या विधवा पत्नीची, त्याच्या मुलांची आणि वृद्ध पालकांची मुलाखत होती. त्यांच्या चेहऱ्यावरील हतबलता आणि डोळ्यांतील भूक नानांना खूपच व्यथित करून गेली.

त्या क्षणी त्यांनी स्वतःला प्रश्न विचारला, "आपण गाड्या का विकत घेत आहोत?" त्यांनी लगेचच मकरंद अनासपुरे यांना फोन केला आणि शेतकरी कुटुंबांना मदत करण्याचा निर्णय घेतला. सुरुवातीला प्रत्येक आत्महत्याग्रस्त कुटुंबाला १५,००० रुपये देण्याचे ठरले. पण बीड जिल्ह्यात जाऊन २००-२५० विधवा महिला आणि त्यांची मुले पाहिल्यावर नानांना समजले की, केवळ एकदाची आर्थिक मदत पुरेशी नाही. त्यानंतरच 'नाम फाउंडेशन'ची स्थापना झाली आणि एका वैयक्तिक दानाचे रूपांतर सामूहिक चळवळीत झाले. नाम फाउंडेशनचे कार्य केवळ आर्थिक मदतपुरते मर्यादित राहिले नाही. संस्थेने शेतकऱ्यांच्या समस्यांची मुळे ओळखून त्यावर दीर्घकालीन उपाययोजना केल्या. शेतकरी आत्महत्यांचे मूळ कारण म्हणजे पाणीटंचाई हे ओळखून संस्थेने जलसंधारणावर भर दिला. नद्यांचे गाळ काढणे, चेक डॅम, बंधारे, तलाव आणि पेरकोलेशन टँक यांसारखे प्रकल्प राबवले. यामुळे भूजल पातळीत लक्षणीय वाढ झाली आणि हजारो एकर जमीन पुन्हा शेतीयोग्य बनली. मराठवाडा, विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रातील अनेक दुष्काळी गावांमध्ये पाणीटंचाई कमी करण्यासाठी हे प्रकल्प राबवले गेले. संस्थेने आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवा, मुले आणि वृद्ध पालकांना आर्थिक सहाय्य पुरवले. नाना पाटेकर स्वतः गावागावात जाऊन कुटुंबांची भेट घेत, त्यांच्या समस्या जाणून घेत आणि मदत वितरित करत. केवळ आर्थिक मदत न करता मानसिक आधार, शैक्षणिक साहाय्य आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यावर भर दिला गेला. शेतकऱ्यांसाठी आधुनिक खेती, जैविक शेती आणि पाणी वाचवणारी पिकपद्धती यांवर प्रशिक्षण शिबिरे आयोजित केली जातात. कृषी मार्गदर्शन केंद्रे उभारून शेतकऱ्यांना बियाणे, खत, तंत्रज्ञान आणि बाजारपेठ यांबाबत माहिती दिली जाते. शास्त्रीय पद्धतींचा वापर करून शेती उत्पादन वाढवण्यास प्रोत्साहन दिले जाते.

शेतकरी कुटुंबातील महिलांसाठी सिलाई मशीन, आटा चक्की, बकऱ्या इत्यादी उपकरणे पुरवून उत्पन्नाचे स्वतंत्र मार्ग उपलब्ध करून दिले. अनेक महिला घरगुती पातळीवर छोटे व्यवसाय सुरू करू शकल्या आणि कुटुंबाच्या उत्पन्नात भर पडली. महिला गट स्थापन करून सामूहिक उद्योगांनाही प्रोत्साहन दिले गेले. गरजू शेतकरी कुटुंबातील मुलांच्या शिक्षणासाठी, भोजनासाठी आणि घरातील मूलभूत गरजांसाठी आर्थिक सहाय्य केले जाते. गरीब कुटुंबातील मुलींच्या सामूहिक विवाह सोहळ्यांचे आयोजन करून कन्यादानाचा आर्थिक भार कमी करण्याचा प्रयत्न केला जातो. अतिवृष्टी किंवा नैसर्गिक आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना त्वरित मदत पोहोचवली जाते. नाम फाउंडेशनच्या यशाचे रहस्य त्यांच्या कार्यपद्धतीत आहे. नाना पाटेकर स्वतः गावागावात फिरून शेतकऱ्यांशी संवाद साधत, त्यांच्या समस्या जाणून घेत आणि मदत वितरित करत. मदत थेट लाभार्थी कुटुंबांपर्यंत पोहोचवण्यावर भर देऊन मध्यस्थी कमी केली गेली. स्थानिक युवक, शिक्षक, शेतकरी यांना स्वयंसेवक म्हणून जोडून कामे राबवली जातात. केवळ तात्काळ मदत न करता पाणी, शेती, रोजगार यांसारख्या मुद्द्यांवर दीर्घकालीन उपाययोजना केल्या जातात. नाम फाउंडेशनसाठी निधी संकलनाचे अनोखे मार्ग अवलंबले गेले. नाना पाटेकर यांनी 'कौन बनेगा करोडपती' आणि 'कोण होणार करोडपती' या कार्यक्रमांमध्ये सहभाग घेऊन अनुक्रमे १५.७ लाख रुपये आणि २५ लाख रुपये जिंकले आणि ते पूर्णपणे नाम फाउंडेशनला दान केले. विशेष म्हणजे संस्थेला देणग्या केवळ उद्योगपतींकडूनच नव्हे, तर सामान्य मध्यमवर्गीय आणि कनिष्ठ मध्यमवर्गीय कुटुंबांकडूनही मिळाल्या. हे नागरिकांचा संस्थेवरील विश्वास दर्शवते.

नाना पाटेकर यांच्या निधनानंतर अनेक नेत्यांनी व सामाजिक कार्यकर्त्यांनी नाम फाउंडेशनच्या कार्याची प्रशंसा केली. विशेषत्वाने जलसंधारण आणि जलसाठा व्यवस्थापनातील संस्थेच्या कामाचा उल्लेख केलेला आहे.शेतकरी व ग्रामस्थांमध्ये नाना पाटेकर यांच्याबद्दल कृतज्ञता आणि शोक व्यक्त केला जात आहे; त्यांना 'बळीराजाचा आधारवड' म्हटले जात आहे. नाना पाटेकर यांनी चित्रपटसृष्टीला जसे अविस्मरणीय कलाकार दिले, तसेच नाम फाउंडेशनच्या माध्यमातून सामाजिक क्षेत्राला एक आदर्श दिला. १.५ कोटी रुपयांची कार न विकत घेता त्या रकमेचे रूपांतर हजारो शेतकरी कुटुंबांच्या आशांमध्ये करण्याचा निर्णय हे त्यांच्या सामाजिक बांधिलकीचे प्रतीक आहे. नाम फाउंडेशन हे केवळ एक संस्था नसून ती एक चळवळ आहे, जी नाना पाटेकर यांच्या निधनानंतरही महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या जीवनात आशादायी बदल घडवत राहील. नाम फाउंडेशन हे नाना पाटेकर यांच्या सामाजिक बांधिलकीचे प्रतीक आहे; जे शेतकऱ्यांच्या आर्थिक, सामाजिक आणि भावनिक गरजांना स्पर्श करून ग्रामीण महाराष्ट्रात टिकाऊ बदल घडवून आणण्याचा प्रयत्न करते. नाना पाटेकर यांचे जीवन हे केवळ चित्रपटापुरते मर्यादित नव्हते, तर ते समाज परिवर्तनाचे एक माध्यम होते. त्यांनी दाखवून दिले की, एक व्यक्ती जर खऱ्या अर्थाने संकल्प घेऊन काम करू लागली, तर ती हजारो लोकांच्या आयुष्यात प्रकाश आणू शकते. नाम फाउंडेशनचे कार्य हे त्याचाच एक भाग आहे. महाराष्ट्रातील शेतकरी आजही नाना पाटेकर यांना आपला मित्र, आपला आधार आणि आपला मार्गदर्शक म्हणून पाहतो. त्यांचे निधन झाले असले, तरी त्यांचे कार्य आणि विचार नाम फाउंडेशनच्या माध्यमातून कायम राहतील.

**- डॉ.राजेंद्र रामहरी टेकाडे, काटोल, जि. नागपूर (९१४५७७९०५)**

## "नाना" आठवणींचे मोहोळ

नाना पाटेकर गेले आणि एकूणच भारतीय चित्रपटसृष्टी तसेच मराठी नाट्यसृष्टीसुद्धा एका जातिवंत आणि बावनकशी अभिनेत्याला कायमची मुकली. नानांसोबतच्याआठवणी आज उचंबळून आल्या. असा रफ अँड टफ परंतु तितकाच मायाळू आणि संवेदनशील अभिनेता आता होणे नाही. त्याच्या हिंदी - मराठी चित्रपटांची यादी तोंडपाठ आहे."हमीदाबाईची कोठी", "पुरुष " ही नाटकेही विसरणे शक्य नाही.नाटक चित्रपट तर सोडाच पण त्याची समाजशील वृत्ती विसरणे शक्य नाही .नाना गेला आणि असंख्य आठवणी मागे सोडून गेला.

सात जानेवारी एकोणीसशे चौऱ्यांणव. मी शाळेत जायच्या तयारीत होतो. एवढ्यात फोन खणखणला. नागपुरातील 'प्रहार समाज जागृती संस्थे'चे संस्थापक लेफ्टनंट कर्नल सुनील देशपांडे यांचा फोन होता. सुनीलची आणि माझी मैत्री १९६३-६४ पासूनची होती. सुनील म्हणजे भारतीय सैन्यातील हुद्देदार माणूस, जिंदादिल आणि सतत नावीन्याच्या शोधात! नाना पाटेकरांच्या 'प्रहार' या चित्रपटासाठी,नाना पाटेकरांचे कमांडोचे प्रशिक्षण सुनीलच्या देखरेखीखाली झाले होते. बेळगावच्या मराठा लाईट इन्फन्ट्रीमध्ये हे प्रशिक्षण झाले होते. नानाची आणि सुनीलची घट्ट मैत्री होती. आमच्या शमावहिनी देशपांड्यांना,नाना बहीण मनात असे.

"हे बघ प्रकाश,परवा नऊ जानेवारीला माझ्या प्रहार समाज जागृती संस्थेच्या उद्घाटनाला नाना पाटेकर येतोय. माझ्याच घरी मुक्काम आहे. तू नऊ तारखेला दुपारी घरी ये. नानासोबत जेवायलाच ये आणि त्याची एक बढिया मुलाखत घे." फोनवर सुनील बोलत होता आणि मी जागेवर उडालोच. स्वप्नातही खरी वाटणार नाही अशी संधी चालून आली होती. माझा रेशीमबागेतील मित्र प्रकाश चिंतामण देशपांडे याला सोबत घेऊन मी, पांडे ले-आऊटमधील सुनीलच्या बंगल्यावर नऊ तारखेला पोहोचलो.

नानाचे एकूण व्यक्तिमत्त्व आणि त्याच्या स्वभावबद्दल बरेच ऐकून होतो. जरा दबकतच मुलाखतीला प्रारंभ केला. परंतु नानाच्या दिलखुलास आणि मोकळ्याढाकळ्या स्वभावाने ताण दूर केला नानाशी झालेल्या मनमोकळ्या गप्पा म्हणजे माझ्या 'मर्मबंधातील ठेव' आहे. चित्रपट सृष्टी, प्रहारचे शूटिंग, सुनीलने दिलेले प्रशिक्षण,सामाजिक प्रश्न यावर चर्चा आणि प्रश्नोत्तरे झाली. जेवण करताना तर बोललोच पण नंतरही सुनीलच्या बंगल्याच्या बागेत,घराच्या दिवाणखान्यात भरपूर गप्पा झाल्या. 'तरुण भारत'मध्ये प्रसिद्ध झालेली ती मुलाखत खूप गाजली.

नंतर अखिल भारतीय विद्यर्थी परिषदेध्या एका कार्यक्रमात,रेशीमबाग मैदानात नानाचे भाषण झाले होते त्यावेळी भेट झाली. १९९७ साली नाशिकला ७७ वे अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलन झाले होते. नागपूरच्या दैनिक 'तरुण भारत'साठी संमेलन कव्हर करायला नाशिकला गेलो होतो. त्या संमेलनाचे अध्यक्ष होते नाना पाटेकर. जबरदस्त अध्यक्षीय भाषण! "रंगमंचाच्या अवकाशातील अंधारात दडलेला शेंदूर शोधायचाय" असेच की, या अर्थाच त्यांचे वाक्य खूप गाजले होते. पडद्यामागे काम करणाऱ्या "बॅक स्टेज वर्कर्स"बद्दल नानाच्या मनात प्रचंड आपुलकी आणि आपलेपणा होता. त्या संमेलनातही भेट झाली गप्पा झाल्या. नागपुरात संस्कार भारतीचा अखिल भारतीय कलासाधक संगम १९९८ साली झाला होता. नाना पाटेकर अतिथी म्हणून आले होते तेव्हाही त्यांची भेट झाली होती.

मोठा पडदा असो की, छोटा पडदा.....रंगमंच असो की व्यासपीठ नानाची एंट्री म्हणजे वाघाची एंट्री ! आता अशी एंट्री होणे नाही. नानाने कायमची एक्झिट घेतली आहे आणि रंगमंचाच्या अंधारातील तो शेंदूरही नानाने आपल्या सोबत नेला आहे.

**- प्रकाश एदलाबादकर, नागपूर**



## अखेरचा हा तुला दंडवत!

काही माणसं आपल्या आयुष्यात फार काळासाठी येत नाहीत. पण त्यांची ओळख आयुष्यभर पुरते. काही माणसांना आपण पडद्यावर पाहतो, त्यांच्या अभिनयाला दाद देतो, पण काही माणसं अशी असतात, की पडद्याच्या पलीकडे जाऊन त्यांना माणूस म्हणून अनुभवावंसं वाटतं. नाना पाटेकर त्यापैकीच एक..

स्व. नाना पाटेकर. आज ते आपल्यात नाहीत, ही गोष्ट स्वीकारणं अजूनही मनाला कठीण जातं. पण त्यांच्या आठवणींना उजाळा दिला की एक वेगळंच समाधान मनात दाटून येतं. कारण 'नाम फाउंडेशन'च्या माध्यमातून नानांना फक्त पाहता आलं नाही, तर त्यांना जवळून अनुभवता आलं. त्यांच्या जवळ बसता आलं. त्यांच्याशी संवाद साधता आला आणि त्यांच्यातला खरा माणूस जाणून घेता आला. आणि या सगळ्या अनुभवामागे दोन महत्त्वाची नावे आहेत; नाम फाउंडेशनचे विदर्भ व खान्देश प्रमुख ज्येष्ठ संपादक, लेखक गुरुवर्य श्याम पेठकर सर व माझे मामा ज्येष्ठ नाट्य व चित्रपट दिग्दर्शक हरिश इथापे.

विदर्भ मराठवाड्यातील वाढत्या शेतकरी आत्महत्यांच्या बातमीने नानाचं मन गहिवरून आलं होतं. नानांचा अभिनेते मकरंद अनासपुरे सरांना फोन गेला. म्हणाले मकरंद मी नवी कार घेणार होतो पण ते पैसे मला आता आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना द्यायचे आहेत, त्याची व्यवस्था कर. मकरंद सरांनी विदर्भात श्याम सरांना व हरीश मामांना फोन केला आणि नानांचा निरोप दिला. नानांशी बोलणं झालं या दोघांनीही त्यांना सांगितलं की, आम्ही व्यवस्था करतो पण नाना तुम्हाला स्वतः चेक द्यायला यावं लागेल. १० ऑगस्ट २०१५ रोजी नागपुरातील वसंतराव देशपांडे सभागृहात हा कार्यक्रम ठरला. जनमंच संस्थेचे तत्कालीन अध्यक्ष अनिल किलोर सर (मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे विद्यमान मा. न्यायमूर्ती) यांनी यासाठी पुढाकार घेतला व विदर्भातल्या शेतकऱ्यांसाठी काम करणाऱ्या जवळपास सर्वच संस्थानी त्यांना साथ देत कार्यक्रम यशस्वी केला.





नागपूर येथे वसंतराव देशपांडे सभागृहात 'एका साध्या सत्यासाठी' या कार्यक्रमाप्रसंगी उपस्थित नाना पाटेकर. यावेळी नामचे मकरंद अनासपुरे, ज्येष्ठ संपादक तथा नामचे विदर्भ समन्वयक श्याम पेठकर, हरिश इथापे, अनिल किल्लोर यांचीही उपस्थिती होती.

सानुग्रह राशीचा तो धनादेश देताना व त्या प्रत्येक शेतकरी कुटुंबीयांशी चर्चा करताना नानांचं मन भरून आलं आणि आता आपण इथे थांबून होणार नाही असं त्यांनी ठरवलं. आणि इथूनच पुढे जन्म झाला नाम फाउंडेशनचा. कार्यक्रमानंतर हॉटेल अशोका येथे नानांना भेटण्याची पहिल्यांदा मला संधी मिळाली. पुढे नाम फाउंडेशन स्थापन झाल्यानंतर नामचा विदर्भ समन्वयक, नागपूर जिल्हा समन्वयक म्हणून मला काम करता आले. एकदा नाना विदर्भ दौऱ्यावर आले असता दोन दिवस वर्धेला मामांच्या घरी मुक्कामाला होते, तेव्हा त्यांच्यातला प्रेमळ आणि जीव लावणारा माणूस अनुभवता आला.

नाना पडद्यावरचे मोठे कलाकार होते. पण त्यांच्याजवळ बसल्यावर जाणवत होतं की, त्यांच्या मोठेपणापेक्षा त्यांच्यातला साधा, संवेदनशील आणि माणुसकी जपणारा माणूस कितीतरी मोठा आहे. 'नाम'च्या माध्यमातून त्यांनी शेतकऱ्यांसाठी जे काम केलं, ते फक्त मदतीपुरतं मर्यादित नव्हतं. त्यांनी माणसाला उभं करण्याचा प्रयत्न केला. निराश झालेल्या आयुष्यात आशेचा किरण दाखवला.

नानांजवळ बसताना, त्यांचं बोलणं ऐकताना कधी कधी वाटायचं, हा माणूस एवढं सगळं करूनही इतका साधा कसा? कदाचित मोठेपणाची खरी व्याख्याच ही असावी. आपण किती मोठे आहोत हे जगाला सांगत बसण्यापेक्षा, आपल्यामुळे दुसऱ्याच्या आयुष्यात छोटासा का होईना, पण बदल घडतोय हे पाहण्यात समाधान मानणं.

आता जाणवतं, माणूस निघून जातो. पण त्याच्याशी जोडलेली माणसं, आठवणी आणि त्याने केलेलं काम त्याला आपल्या जवळ ठेवतं. नानांच्या जाण्याने केवळ मराठी-हिंदी चित्रपटसृष्टीचे नुकसान झालेले नाही, तर महाराष्ट्रासह संपूर्ण देशाने एक संवेदनशील देशभक्त, शेतकऱ्यांचा आधारवड आणि माणसांच्या दुःखासाठी आयुष्य झिजवणारा बापमाणूस गमावला आहे.

चंदेरी दुनियेत मोठे नाव कमावूनही नानांचे पाय कायम गावच्या मातीत होते. दुष्काळाने होरपळलेल्या शेतकऱ्यांच्या डोळ्यांतील अश्रू त्यांनी जवळून पाहिले. आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांच्या वेदना आपल्या मानून त्यांना आधार दिला. जलसंधारणाच्या माध्यमातून दुष्काळी मातीत पाणी पेरले. सीमेवरील सैनिकांविषयी त्यांच्या मनात अपार प्रेम, आदर आणि राष्ट्रभक्ती होती. नाना हे केवळ अभिनेते नव्हते; ते शेतकऱ्यांच्या दुःखावर फुंकर घालणारे, सैनिकांच्या वेदना समजून घेणारे सच्चे देशभक्त आणि नाम फाउंडेशनच्या माझ्यासारख्या असंख्य कार्यकर्त्यांचे पितृतुल्य पालक होते, आधारवड होते.

नानांना जवळून भेटता आलं, त्यांच्यासोबत काही क्षण घालवता आले, त्यांना जाणून घेता आलं. आठवणींमध्ये ते आहेत, 'नाम'च्या प्रत्येक कामात ते आहेत, शेतकऱ्याच्या चेहऱ्यावरच्या समाधानात ते आहेत, आणि माणुसकी जिवंत ठेवणाऱ्या प्रत्येक प्रयत्नात ते आहेत. काही माणसं शरीराने दूर जातात. पण त्यांच्या आठवणी इतक्या जवळ राहतात,
की कधी कधी वाटतं 'आपण अजूनही त्यांच्याशीच बोलतोय, त्यांना अजूनही जवळूनच अनुभवतोय'
नाना, तुम्हाला भेटता आलं,
तुमच्या जवळ बसता आलं,
तुम्हाला जाणून घेता आलं,
ही आठवण आयुष्यभर मनात जपून ठेवू..

**- कौस्तुभ पवार, उमरेड**

थोडक्यात

## सायबर जनजागृती महिन्यानिमित्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

सायबर जनजागृती महिन्यानिमित्त एडुसन फाऊंडेशनच्या वतीने मिशन सायबर फिट इंडिया अंतर्गत यशवंत उच्च माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, ओंकारनगर, नागपूर येथे ७ ऑक्टोबर २०२६ रोजी सायबर जनजागृती व मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले. यावेळी सायबर सेलच्या आचल चित्तारी आणि एडुसन फाऊंडेशनचे संचालक निलेश काळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संचालक व संस्थापक मधुकर दळवेकर होते. मुख्याध्यापिका प्रतीक्षा वाघमारे यांच्यासह शिक्षकवृंद उपस्थित होते.

आचल चित्तारी यांनी ऑनलाइन फसवणूक, बनावट लिंक व संदेश, अढङ फाईल्स, सायबर बुलिंग, डिजिटल अरेस्ट, सोशल मीडिया, पासवर्ड सुरक्षितता आणि वैयक्तिक माहितीचे संरक्षण याबाबत मार्गदर्शन केले. तसेच गेमिंग व लोन अँप्सच्या माध्यमातून होणाऱ्या फसवणुकीपासून सावध राहण्याचे आवाहन केले. निलेश काळे यांनी विद्यार्थ्यांनी डिजिटल माध्यमांचा संतुलित वापर करून वाचन, प्रत्यक्ष संवाद, स्वतंत्र विचार, लेखन व समस्या सोडविण्याची क्षमता विकसित करण्यावर भर द्यावा, असे सांगितले. ChatGPT व इतर अक साधनांचा वापर करताना स्वतःचा विचार आणि विश्लेषण क्षमता जपण्याचे आवाहनही त्यांनी केले. कार्यक्रमात प्रश्नोत्तर सत्र घेण्यात आले. शेवटी विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षा व जबाबदार डिजिटल नागरिकत्वाची शपथ घेतली. उपक्रमाला विद्यार्थी व शिक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

## राष्ट्रीय शिक्षक दिनानिमित्त से. नि. प्राचार्य सुधीर बुटे यांचा सत्कार



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

सी पि अँड बेरार शिक्षण संस्था द्वारा संचालित लाखोटीया भुतडा विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय कोंढाळी येथे से नि प्राचार्य सुधीर चंपतराव बुटे यांचा ५ ऑक्टोबर जागतिक शिक्षक दिनाचे औचित्य साधून बुधवार दि. ७ ऑक्टोबरला विद्यालयात शाल, सन्मानचिन्ह, पुष्पगुच्छ देऊन प्राचार्य कैलास थुल यांचे हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी जेष्ठ से नि शिक्षक प्रा.भास्कर पहाड, माजी प्राचार्य दामोधर कुहीटे, माजी प्राचार्य गणेश शेंबेकर, उपमुख्याद्यापक मनोज ढाले, जेष्ठ पर्यवेक्षक सुनील सोलव, पर्यवेक्षक अर्चना ढाले, माजी से. नि. शिक्षक कर्मचारी आदी उपस्थित होते.

से. नि प्राचार्य सुधीर बुटे यांची संस्थेला ३२ वर्षाची प्रदीर्घ सेवा लाभली. याकाळात अनेक शालेय राष्ट्रीय खेळाडू, विविध खेळात राज्य विजेते पद मिळविण्यास प्रशिक्षक मार्गदर्शकाची प्रभावी पाडलेली भूमिका, कनिष्ठ महाविद्यालयात अद्यापन कार्य आदी कर्तव्य बजावले तसेच २०२३ मध्ये प्राचार्य पदावर असतांना जिल्यातील सर्वात्कृठ माजी शाळा सुंदर शाळा मुख्यमंत्री ११ लक्ष अवार्ड, सलग दोन वर्षे शाळेला अपग्रेट मुख्यमंत्री अवार्ड स्पर्धेत निवड व सहभाग,शालांत परीक्षेत राज्यात सर्वाधिक गुण मिळविणारे यादीत शाळेची चारुल नासरे हिने मिळविले.

ऐतिहासिक सुयश, जिल्यात सलग तीन वर्ष उत्कृष्ठ निकाल, गुणवत्ता वाढ, त्या करिता नाविन्यपूर्ण नवनवीन उपक्रमाची प्रभावी अंमलाबजावणी महत्वाची ठरली. विशेष म्हणजे याकरिता उत्स्फूर्त सहभाग व कर्तव्य बजावणारे सर्व कर्तव्यदक्ष शिक्षक व कर्मचारी वर्ग, सक्रिय व्यवस्थापक मंडळ, पालक,ग्रामस्थ,पत्रकार मंडळी,परिसरातील प्रतिष्ठित नागरिक, प्रशासकीय अधिकारी यांचे उस्फुर्त मिळालेल्या सहकार्याबद्दल से. नि प्राचार्य सुधीर बुटे यांनी कृतज्ञता व्यक्त केली. सन्मान दिल्याबद्दल सर्वांचे आभार व्यक्त केले.

## राष्ट्रीय आदर्शमध्ये वन्यजीव सप्ताहानिमित्त प्रश्नमंजुषा



**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

राष्ट्रीय आदर्श विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय नवेगाव खैरी द्वारा संचालित राष्ट्रीय हरित सेना आणि बॅनियन ट्री फाउंडेशन यांचे संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय आदर्श विद्यालय शिक्षण मंडळाचे सचिव मयंकराव देशमुख व मुख्याध्यापक राजू बर्वे यांचे मार्गदर्शनाखाली ७ ऑक्टोबरला वन्यजीव सप्ताहांतर्गत प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष व इको क्लबचे समन्वयक शिक्षक साक्षोधन कडबे, पारशिवनी तालुका पत्रकार संघाचे प्रतिनिधी व प्रमुख पाहुणे कमल यादव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. मंचावर शाळेचे शिक्षक दिलीप पवार, राजू नरड, सतीश जुननकर, प्रा. अरविंद दुनेदार, शैलेंद्र देशमुख, अमित मेश्राम, रितेश मैंद, अनिल कोल्हे, प्रा. मोहना वाघ, अर्चना येरखेडे प्रामुख्याने उपस्थित होते.

यावेळी घेण्यात आलेल्या प्रश्नमंजुषा स्पर्धेत इयत्ता नववीतील रिध्दी राऊत, दिक्षा तुपट, मोंटी राऊत, पूर्वी वझाडे, मानवी सलामे यांच्या गटाने प्रथम क्रमांक पटकावला. हर्षल बेदरे, दक्ष मेश्राम, आर्यन उईके, वंश वासनिक यांच्या बिबट गटाने द्वितीय, कावेरी रेवडे, नव्या सोनटक्के, अंजली आंबाडारे, तनू भागडकर, खुशी राऊत यांच्या गटाने तृतीय आणि संकेत सहारे, अनिकेत सहारे, यश बगमारे, आकर्ष राऊत यांच्या गटाने चतुर्थ क्रमांक मिळवला. प्रश्नमंजुषेचे मंच संचालन इयत्ता दहावीची संजीवनी सूर्यवंशी हिने केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शालेय कर्मचारी लीलाधर तांदूळकर, मोरेश्वर दुनेदार व समस्त विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

# ज्ञानासाठी गुंतवणूक हाच आपला विकासमंत्र : आ. अभिजित वंजारी

### २५० वाचनालये आणि १३०० शाळा-महाविद्यालयांना डिजिटल साधनांचा लाभ, ब्रह्मपुरीत काँग्रेस कार्यकर्त्यांची बैठक

**दै. सिंहवाणी वृत्त, ब्रह्मपुरी (चंद्रपूर)**

शिक्षण आणि ज्ञानातील गुंतवणूक हीच समाजाच्या प्रगतीची खरी पायाभरणी आहे. पदवीधर मतदारसंघाचा आमदार म्हणून मिळालेल्या निधीतून उद्याचे विद्यार्थी घडविण्याला आपण प्राधान्य दिले. त्यामुळे आमदार म्हणून मिळणारा निधी हा ज्ञानासाठीची गुंतवणूक आहे, असे प्रतिपादन नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाचे विद्यमान आमदार तथा काँग्रेस-महाविकास आघाडीचे उमेदवार अभिजित वंजारी यांनी केले.

ब्रह्मपुरी येथील आरमोरी मार्गावरील झाडे मीटिंग हॉलमध्ये आयोजित काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या बैठकीत ते बोलत होते. नागपूर विभागातील नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली या सहाही जिल्ह्यांमध्ये विकासकामांना गती मिळावी, यासाठी आपल्या आमदारकीच्या कार्यकाळात सातत्याने पाठपुरावा केल्याचे वंजारी यांनी सांगितले.



समाजाच्या प्रगतीसाठी शिक्षणाला केंद्रस्थानी ठेवणे गरजेचे आहे. याच भावनेतून आपल्या कार्यकाळात २५० सार्वजनिक वाचनालयांना स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त आधुनिक पुस्तके उपलब्ध करून देण्यात आली. तसेच सुमारे १३०० शाळा व महाविद्यालयांना संगणक संच देऊन डिजिटल शिक्षणाला बळकटी देण्याचा प्रयत्न केला, असे वंजारी यांनी सांगितले.

आमदारकीच्या मागील सहा वर्षांत केलेली ही ज्ञानोपयोगी कामे मतदारांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्याचे आवाहन त्यांनी कार्यकर्त्यांना केले. पदवीधर मतदारसंघातील प्रत्येक जिल्ह्यातील पदवीधरांपर्यंत विकासकामांची माहिती पोहोचवून त्यांचा विश्वास संपादन करा. ज्ञान, शिक्षण आणि रोजगाराच्या संधी अधिक सक्षम करण्यासाठी आपली भूमिका स्पष्टपणे मतदारांसमोर मांडा, असेही त्यांनी सांगितले.

**काँग्रेसला पुन्हा संधी देण्याचा विश्वास**

बैठकीपूर्वी ब्रह्मपुरी तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने आमदार अभिजित वंजारी यांचे स्वागत करण्यात आले. मागील निवडणुकीत मतदारांनी काँग्रेसच्या उमेदवाराला कौल देत वंजारी यांना संधी दिली. या संधीचे त्यांनी आपल्या कामातून सोने केले असून, ज्ञानाच्या या यज्ञात यंदाही प्रत्येक मतदार आपली मतरूपी समिधा टाकेल, असा विश्वास काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

आमदार वंजारी यांनी सहाही जिल्ह्यांमध्ये शिक्षण आणि ज्ञानाला प्राधान्य देत केलेली कामे पदवीधर मतदारांच्या हिताची आहेत. ही कामे मतदारांपर्यंत पोहोचविण्यासाठी कार्यकर्ते जीवाचे रान करतील, असा विश्वास ब्रह्मपुरी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

यावेळी ब्रह्मपुरी तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष खेमराज तिडके, शहराध्यक्ष बाळूभाऊ राऊत, माजी प्राचार्य डॉ. देविदास जगनाडे, प्राचार्य डॉ. रमेश कांबळे, माजी जिल्हा परिषद सदस्य प्रमोद चिमूरकर, प्राचार्य डॉ. एन. एस. कोलोडे, प्रदेश सचिव डॉ. ज्ञानेश्वर कायरकर, माजी सभापती नेताजी मेश्राम, खो.रि.पा.चे राज्य सरचिटणीस बागडे, नगराध्यक्ष योगेश मिसार, नगरपरिषद उपाध्यक्ष नितीन उराडे, महिला काँग्रेस तालुका अध्यक्ष मंगला लोनबले, महिला काँग्रेस शहराध्यक्ष सौ. योगिता आमले यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पवित्र पोर्टल शिक्षक भरतीप्रकरणी गोंदियात पुन्हा खळबळ!

### हिंदी माध्यमाच्या उमेदवारांच्या पात्रतेसंदभार्तील अनियमिततेवर गंभीर आक्षेप; पारदर्शक चौकशी व दोषींवर कारवाईची मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा**

पवित्र पोर्टलमार्फत राबविण्यात आलेल्या TAIT-2025 शिक्षक भरती प्रक्रियेत हिंदी माध्यमाच्या उमेदवारांच्या पात्रतेसंदर्भात झालेल्या कथित अनियमिततेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. या प्रकरणी गोंदिया जिल्हा परिषद शिक्षण विभागासह संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे निवेदन व पत्रव्यवहार करून संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून पात्र उमेदवारांना न्याय देण्याची मागणी करण्यात आली आहे. निवेदनात माध्यमनिहाय रोस्टर, पवित्र पोर्टलवरील जाहिरात, हिंदी माध्यमाच्या जागांची नोंद, उमेदवारांची निवड प्रक्रिया तसेच प्रशासकीय पातळीवरील निर्णय याबाबत गंभीर प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत.



**रोस्टर व जाहिरातीतील विसंगतीचा आरोप**

निवेदनानुसार, हिंदी माध्यमाच्या शाळांसाठी आवश्यक असलेल्या स्वतंत्र बिंदूनामावली/रोस्टरचा योग्य प्रकारे विचार झाला नसल्याचा आक्षेप घेण्यात आला आहे. माध्यमनिहाय पदांची उपलब्धता आणि प्रत्यक्ष जाहिरात यामध्ये विसंगती असल्यास पात्र उमेदवारांच्या संधीवर परिणाम होऊ शकतो, असा दावा करण्यात आला आहे.

**नियमबाह्य भरती झाली का? – चौकशीची मागणी**

भरती प्रक्रियेत नियमांचे पालन झाले का, संबंधित रोस्टरची योग्य पडताळणी झाली का, उमेदवारांची निवड कोणत्या निकषांवर करण्यात आली आणि संपूर्ण प्रक्रियेत कोणाची जबाबदारी होती, याची सखोल व निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

निवेदनात प्रशासनाकडून यापूर्वी करण्यात आलेल्या पत्रव्यवहाराचा संदर्भ देत, प्रकरणाची वस्तुस्थिती स्पष्ट करण्यासाठी लेखी उत्तर व आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करून देण्याची मागणीही करण्यात आली आहे.

**पारदर्शकता नसेल तर आंदोलनाचा मार्ग!**

उमेदवारांच्या हक्कांशी संबंधित हा गंभीर विषय असल्याने प्रशासनाने तातडीने निर्णय घेऊन पात्र उमेदवारांना न्याय द्यावा. अन्यथा पुढील काळात लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

**वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठविले निवेदन**

या प्रकरणाची माहिती व मागण्यांचे निवेदन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद गोंदिया; जिल्हाधिकारी गोंदिया; सहाय्यक आयुक्त, मागासवर्गीय कक्ष नागपूर; विभागीय आयुक्त नागपूर; आयुक्त महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे; शिक्षण आयुक्त पुणे तसेच प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय मुंबई यांच्याकडे सादर करण्यात आल्याचे पत्रात नमूद आहे.

**पात्र उमेदवारांना न्याय देण्याची मागणी**

शिक्षक भरती प्रक्रिया पारदर्शक, नियमबद्ध आणि न्याय्य पद्धतीने व्हावी. झालेल्या त्रुटींची जबाबदारी निश्चित करून पात्र उमेदवारांचे नुकसान भरून काढावे, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे.

या प्रकरणामुळे गोंदिया जिल्ह्यातील हिंदी माध्यमाच्या शिक्षक पदांच्या भरतीकडे उमेदवारांचे लक्ष लागले असून, प्रशासन या आक्षेपांवर काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष आहे. या मागणी चे निवेदन देताना अन्यायग्रस्त उमेदवार राजेश्वरी मानदास बसेना, जानकी चुनेंद्र दसरिया, ललितकुमार रायसिंग मच्छिरके, गायत्री दिपक नागपुरे, संजयकुमार मंगलदास सुलाखे, प्रदीपकुमार किशोरकुमार नागपुरे, दीपक उमेंदसिंह मच्छीरके, राहुल राजेश कानोजे, डीलेश्वरी डीलेश्रर पटले, देवकी लिल्हारे, प्रवीण लिखनदास सुलाखे आदी उपस्थित होते.

## बॅडमिंटन स्पर्धेत चारवी राठोडची विभागीय स्तरासाठी निवड

### आमगावच्या श्री स्वामी विवेकानंद स्कूलच्या विद्यार्थिनीचे जिल्हास्तरावर उल्लेखनीय यश; वर्धा येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धेत करणार गोंदिया जिल्ह्याचे प्रतिनिधित्व



**दै. सिंहवाणी वृत्त, आमगाव**

शालेय क्रीडा विभागाच्या वतीने आयोजित शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील शालेय स्तरावरील बॅडमिंटन जिल्हास्तरीय स्पर्धेत आमगाव येथील श्री स्वामी विवेकानंद स्कूलच्या अंडर-१७ मुलींच्या गटातील विद्यार्थीनी चारवी किशोर राठोड हिने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. जिल्हास्तरीय निवड चाचणीत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करीत तिने विजय मिळवला असून तिची आगामी विभागीय स्तरावरील बॅडमिंटन स्पधेर्साठी निवड झाली आहे. गोंदिया जिल्ह्यातून अंडर-१७ मुलींच्या गटात निवड होणे ही चारवी राठोड हिच्यासह श्री स्वामी विवेकानंद स्कूलसाठी अभिमानाची बाब ठरली आहे. आगामी विभागीय स्तरावरील बॅडमिंटन स्पधेर्चे आयोजन वर्धा येथे करण्यात येणार असून या स्पर्धेत चारवी गोंदिया जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहे.

चारवीने मिळविलेल्या या यशाबद्दल श्री स्वामी विवेकानंद स्कूलच्या प्राचार्या स्मृती छपरीया, क्रीडा शिक्षिका मालती लीलारे, निखिल सर, सर्व शिक्षकवर्ग तसेच प्रशिक्षक सिद्धार्थ पवार यांनी तिचे अभिनंदन केले. आगामी विभागीय स्पर्धेतही उत्कृष्ट कामगिरी करून शाळेचे व गोंदिया जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करावे, अशा शुभेच्छा यावेळी देण्यात आल्या. चारवीच्या या यशाबद्दल तिचे आई-वडील नीतू राठोड व किशोर राठोड, आजी यशोदाबाई राठोड, आजोबा डॉ. सुदाम मानसिंग राठोड, नानी मीराबाई पवार तसेच नाना, माजी पोलीस पाटील रामचंद्र हेमला पवार यांच्यासह कुटुंबीयांनी तिच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला. लहान वयातच क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या चारवी राठोड हिच्या विभागीय स्तरावरील निवडीमुळे आमगाव परिसरातील क्रीडाप्रेमींमध्येही आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# सातगाव प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये मानसिक त्रास व धमकीचा आरोप

### मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे कारवाईची मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा**

सालेकसा प्राथमिक आरोग्य केंद्र, सातगाव (साखरीटोला) येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रशांत सी. तेलसे व आरोग्य केंद्र मधील सर्व कर्मचाऱ्यांनी सातगाव येथील नागरिक राजू काळे यांच्याविरोधात मानसिक प्रताडणा, दमदाटी, अपमानास्पद वागणूक तसेच धमकी देत असल्याबाबत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार केली आहे.

तक्रारीनुसार, मागील एक महिन्यापासून राजू काळे यांच्याकडून धमकावणे, अपशब्द वापरणे, फोनवरून धमकी देणे तसेच वारंवार कार्यालयात येऊन वाद घालणे, प्रशासकीय कामात अडथळा निर्माण करणे आदी प्रकार सुरू असल्याचे नमूद करण्यात आले आहे. यामुळे कर्मचाऱ्यांना मानसिक त्रास होत असून त्यांच्या मनोबलावर परिणाम होत असल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

या प्रकरणाची पार्श्वभूमी ग्रामपंचायत सातगावमार्फत स्रूँ च्या आतील जागेवर सुरू असलेल्या बांधकामाशी संबंधित असल्याचे तक्रारीत नमूद आहे. कार्यालय प्रमुख म्हणून संबंधित बांधकामाबाबत विभागास लेखी माहिती देण्यात आली होती. तसेच बांधकामाच्या मंजुरीचे पुरावे दस्तऐवज पीएचसी कार्यालयास सादर केले गेले असल्याची माहिती तक्रारीत देण्यात आली आहे. तक्रारीनुसार, दि. ४ सप्टेंबर २०२६ रोजी राजू काळे यांनी फोनवरून मारण्याची धमकी दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. याबाबत जिल्हा आरोग्य अधिकारी तसेच तालुका आरोग्य अधिकारी यांना माहिती देण्यात आल्याचेही पत्रात नमूद आहे.




**पीएचसी परिसरातील विविध समस्यांचाही तक्रारीत उल्लेख**

तक्रारीत पीएचसी मधील पाइपलाइन तुटल्यामुळे वॉशरूममध्ये पाणीपुरवठा बंद होणे, पाणीपुरवठ्याशी संबंधित अडचणी, पीएचसीच्या आतील इमारतीची अनधिकृतपणे पाडणी, पीएचसीच्या आतील जागेवर बांधकाम सुरू करणे, पीएचसी परिसरात कचरा मारणे, कर्मचाऱ्यांना दमदाटी व असभ्य वर्तन करणे, शासकीय कामात अडथळा आणणे तसेच कार्यालयीन कामकाजात हस्तक्षेप करणे आदी १२ मुद्द्यांचा उल्लेख करण्यात आला आहे.

तक्रारदारांनी म्हटले आहे की, संबंधित व्यक्तीकडून वारंवार अशा प्रकारचे वर्तन केले जात असल्याने कर्मचाऱ्यांना मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या पदाच्या मानसन्मानाचीही हानी होत असून कार्यालयीन वातावरणावर परिणाम होत असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

> याविषयी भ्रमणध्वनी वरून अधिक संपर्क केला असता सदर राजू काळे यांची तक्रार मला प्राप्त झाली आहे. या तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित अहवाल कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद गोंदिया यांच्याकडे पाठवण्यात आलेला आहे. जर तक्रारीत तथ्य आढळले तर नक्कीच शासकीय कामात अडथळा निर्माण करणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई केली जाईल.
>
> **- डॉ.अभिजीत गोल्हर, जिल्हा आरोग्य अधिकारी, गोंदिया**

**बांधकामाची चौकशी करून कर्मचाऱ्यांना संरक्षण देण्याची मागणी**

या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून पीएचसी परिसरात सुरू असलेल्या बांधकामाबाबतची परवानगी व संबंधित कागदपत्रांची तपासणी करावी, तसेच कर्मचाऱ्यांना धमकी, दमदाटी व अपमानास्पद वागणुकीपासून संरक्षण मिळावे, अशी मागणी वैद्यकीय अधिकारी व पीएचसी कर्मचाऱ्यांनी केली आहे.

तसेच संबंधित व्यक्तीविरुद्ध चौकशी करून दोष आढळल्यास नियमानुसार कारवाई करण्यात यावी, अशी मागणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे करण्यात आली आहे. सदर तक्रार करणाऱ्यांमध्ये डॉ. हर्षिणी शिवणकर, वैद्यकीय अधिकारी, एन एल उके आरोग्य सहाय्यक एस एस बोघे. एस.बी राहागडाले, टी डी सैयद, परिचर एम बी कावरे वाहन चालक रवी पडोले यांच्यासह इतर आरोग्य विभागाच्या शासकीय कर्मचाऱ्यांनी लेखी तक्रार केली आहे.

थोडक्यात

## वाढत चाललेल्या महागाईपेक्षाही कमी होत चाललेल्या माणुसकीचा प्रश्न बिकट
### राज्य पुरस्कार विजेते साहित्यिक शिक्षक सचिन बेंडभर यांचे प्रतिपादन




**दै. सिंहवाणी वृत्त, पुणे**

समाजात संवेदनशीलता दिवसेंदिवस कमी होत चाललेली आहे. ही बाब अतिशय गंभीर असून वाढत चाललेल्या महागाईपेक्षा कमी होत चाललेल्या माणुसकीचा प्रश्न बिकट आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध साहित्यिक सचिन बेंडभर यांनी मरकळ येथील नवीन माध्यमिक विद्यालयामध्ये मराठी अभिजात सप्ताहाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या कार्यक्रमात मराठी भाषेचे सौंदर्य या विषयावर बोलताना व्यक्त केले.

अभिजात भाषा दिनाचे औचित्य साधून मरकळ येथील नवीन माध्यमिक विद्यालयामध्ये मराठी अभिजात भाषा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. त्यानिमित्ताने लेखक आपल्या भेटीला या अभिनव उपक्रमात प्रसिद्ध कवी, लेखक व राज्य शासनाचा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त साहित्यिक सचिन बेंडभर यांना मराठी भाषेचे सौंदर्य या विषयावर बोलण्यासाठी आमंत्रित करण्यात आले होते. यावेळी पाठ्यपुस्तकातील लेखक पाहून मुले आनंदून गेली. विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाला उदंड प्रतिसाद दिला.

सचिन बेंडभर यांनी यावेळी मराठी भाषा परंपरा, संस्कृती आणि भाषेचे सौंदर्य याविषयी माहिती देत त्या संदर्भात आपल्या येते जगाया उभारी, बाप माझा वारकरी आणि आजोळ या स्वरचित कविता सादर केल्या. कविता कशी तयार होते? कवितेची पार्श्वभूमी कशी तयार होते? तसेच समाज निर्मितीच्या कार्यात साहित्यिक कसे योगदान देतात? याविषयी सांगताना त्यांनी अनेक सामाजिक प्रश्नांना हात घालत त्याविषयी कविता सादर केल्या. ते करत असताना त्यांनी मराठी भाषा आणि तिचे सौंदर्य विद्यार्थ्यांना उलगडून सांगितले. याप्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या छाया लाटे, विष्णू जाचक, महेश पानसरे, दीपक गायकवाड, संतोष आव्हाळे, दत्तात्रय नाईकडे आणि संदीप पोकळे आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

## मनसर महापारेषण उपकेंद्रात शिरली घोरपड सुरक्षित रेस्क्यू



**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

रामटेक तालुक्यातील मनसर येथील महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित (महापारेषण) उपकेंद्रात आज, ८ ऑक्टोबर ला दुपारी ठीक दोनच्या सुमारास एक मोठी घोरपड अचानक शिरल्याने एकच खळबळ उडाली. मात्र, स्थानिक सर्पमित्र सागर धावडे यांनी तातडीने धाव घेत या घोरपडीला सुरक्षितरीत्या पकडून जीवदान दिले. मिळालेल्या माहितीनुसार, मनसर येथील उच्च दाबाच्या वीज उपकेंद्राच्या आवारात आज दुपारी दोन वाजेच्या सुमारास कर्मचाऱ्यांना एक घोरपड फिरताना आढळून आली. उपकेंद्रात विद्युत वाहिन्या आणि अत्यंत संवेदनशील हाय-व्होल्टेज उपकरणे असल्याने वन्यजीवांच्या जीवाला मोठा धोका निर्माण होऊ शकतो, तसेच तांत्रिक बिघाड होण्याचीही शक्यता असते. यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये काही काळ भीती व चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते.

घटनेची गंभीरता ओळखून कर्मचाऱ्यांनी तातडीने स्थानिक वन्यजीव रक्षक व सर्पमित्र सागर धावडे यांच्याशी संपर्क साधला. माहिती मिळताच सागर धावडे यांनी कोणतीही वेळ न गमावता महापारेषण उपकेंद्र गाठले. त्यांनी अत्यंत कौशल्याने आणि घोरपडीला कोणतीही इजा न पोहोचवता तिला सुरक्षितरीत्या ताब्यात घेतले (रेस्क्यू केले). घोरपडीला पकडल्यानंतर उपकेंद्रातील कर्मचाऱ्यांनी सुटकेचा श्वास सोडला. या वन्यजीवाची प्राथमिक आरोग्य तपासणी करून, वनविभागाच्या नियमांनुसार तिला सुरक्षित नैसर्गिक अधिवासात (जंगलात) सुखरूप सोडण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे. सागर धावडे यांच्या या तत्परतेबद्दल महापारेषणचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी त्यांचे आभार मानले आहेत.

**अंधश्रद्धा बाळगू नकाः सर्पमित्र सागर धावडे यांचे आवाहन**

घोरपडीला रेस्क्यू केल्यानंतर नागरिकांना मार्गदर्शन करताना सर्पमित्र सागर धावडे म्हणाले, "ग्रामीण भागात घोरपडीबद्दल अनेक गैरसमज आणि अंधश्रद्धा पसरलेल्या आहेत. घोरपड अंगावरून गेल्यास किंवा घरात आल्यास अपशकुन होतो, असा चुकीचा समज लोकांमध्ये आहे. परंतु, यात काहीही तथ्य नाही. घोरपड हा अत्यंत लाजाळू आणि निरुपद्रवी प्राणी आहे. तो निसर्गाच्या अन्नसाखळीतील एक महत्त्वाचा घटक असून कीटक व लहान उंदीर खाऊन शेतकऱ्यांना मदत करतो. त्यामुळे अशा अंधश्रद्धांना बळी न पडता वन्यजीवांचे रक्षण करणे हे आपले कर्तव्य आहे. परिसरात कोणताही वन्यजीव आढळल्यास त्यांना मारू नका, तर तात्काळ वनविभाग किंवा सर्पमित्रांशी संपर्क साधा." अनुसूची १ मध्ये समावेश : भारतीय वन्यजीव कायद्याच्या अनुसूची १, भाग २ (उभयचर आणि सरपटणारे प्राणी) अंतर्गत घोरपडीचा समावेश करण्यात आला आहे.

# जाती-पातीच्या भिंती दूर करत विद्यार्थ्यांसाठी उभारणार एकत्रित हॉस्टेल : चंद्रशेखर बावनकुळे

### विभागीय स्तरावर १ हजार, जिल्हा स्तरावर ५०० विद्यार्थ्यांची क्षमता, १३ ऑक्टोबरपर्यंत जागा निश्चित करून प्रस्ताव पाठविण्याचे निर्देश

**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**

जाती-पातीच्या भिंती दूर करून सर्व समाजातील विद्यार्थ्यांना एकाच ठिकाणी चांगल्या सुविधा मिळाव्यात, यासाठी राज्यभरात एकत्रित विद्यार्थी वसतिगृहे उभारण्यात येणार असून त्यासाठी योग्य जागा निश्चित करून १३ ऑक्टोबरपर्यंत प्रस्ताव शासनाकडे पाठवावेत, असे निर्देश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज मंत्रालयात झालेल्या बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांना दिले. विभागीय स्तरावर एक हजार, तर जिल्हा स्तरावर ५०० विद्यार्थ्यांच्या क्षमतेची वसतिगृहे उभारण्यात येणार आहेत.

इतर मागासवर्ग बहुजन कल्याण विभागाच्या वसतिगृहांसाठी जागा उपलब्ध करून देण्याबाबत झालेल्या या बैठकीत आदिवासी, अनुसूचित जाती-जमाती, इतर मागासवर्गीय, मराठा तसेच सर्व समाजातील विद्यार्थ्यांना स्वतंत्र वसतिगृहांऐवजी भविष्यात एकाच ठिकाणी निवासाची सुविधा उपलब्ध करून देण्याच्या संकल्पनेवर चर्चा झाली. त्यासाठी योग्य आणि सोयीस्कर शासकीय जागा निश्चित करून प्रस्ताव पाठविण्याच्या सूचना देण्यात आल्या.

वसतिगृहासाठी जागा निवडताना केवळ उपलब्ध शासकीय जागेचा विचार न करता विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून जागेची निवड करावी, असे बावनकुळे यांनी स्पष्ट केले. विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी ये-जा करणे सोपे व्हावे, सार्वजनिक वाहतूक उपलब्ध असावी तसेच आरोग्य सुविधा, बाजारपेठ आणि इतर दैनंदिन गरजा सहज उपलब्ध होतील, अशा ठिकाणी जागा असावी. भविष्यातील विस्ताराची शक्यताही लक्षात घ्यावी, असे त्यांनी सांगितले.

राज्यात यापूर्वी विविध समाजघटकांसाठी स्वतंत्र वसतिगृहांची व्यवस्था करण्यात आली आहे. मात्र, पुढील काळात उभारण्यात येणाऱ्या वसतिगृहांमध्ये सर्व समाजातील विद्यार्थ्यांना एकत्रितपणे निवासाची सुविधा देण्याची संकल्पना राबविण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना दर्जेदार पायाभूत सुविधा मिळण्याबरोबरच त्यांच्यात परस्पर संवाद, सलोखा आणि सामाजिक समरसता वाढण्यासही यामुळे मदत होईल, असे बावनकुळे यांनी सांगितले.

**महाज्योतीच्या वसतिगृहांसाठी जिल्हाधिकाऱ्यांनी पुढाकार घ्यावा**

महाज्योतीमार्फत वसतिगृहां साठी मागणी करण्यात आलेल्या जागांबाबत संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने कार्यवाही करावी, अशा सूचना देण्यात आल्या. चंद्रपूर, बीड, परभणी, धाराशिव, नांदेड, सांगली, सोलापूर, अकोला, यवतमाळ, गोंदिया आणि वाशिम या जिल्ह्यांतील जागांबाबत आवश्यक कार्यवाही करून प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यास सांगण्यात आले.

महाज्योतीच्या वसतिगृहांसाठी किमान १ हजार विद्यार्थ्यांची क्षमता असलेले वसतिगृह उभारता येईल, अशा स्वरूपाचे प्रस्ताव तयार करावेत. उपलब्ध जागेचे क्षेत्रफळ, स्थान, दळणवळणाची सुविधा, परिसरातील शैक्षणिक व नागरी सुविधा आणि भविष्यातील विस्ताराची शक्यता यांचा विचार करून प्रस्ताव सादर करावेत, असे निर्देश देण्यात आले.

काही ठिकाणी जागा उपलब्ध करून देण्याबाबत शासनस्तरावर निर्णय झालेला असतानाही संबंधित जागांचे प्रॉपर्टी कार्ड पूर्ण झालेले नसल्याने पुढील कार्यवाही प्रलंबित आहे. संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी प्रॉपर्टी कार्डची कार्यवाही पूर्ण करून आवश्यक कागदपत्रांसह प्रस्ताव शासनाकडे सादर करावेत, असेही बावनकुळे यांनी सांगितले.

**विद्यार्थ्यांच्या सोयीला प्राधान्य**

आपणही विद्यार्थी होतो. त्या काळातील विद्यार्थ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन या जागांकडे पाहा. विद्यार्थ्यांना चांगल्या सुविधा मिळाल्या पाहिजेत, यासाठी विशेष लक्ष द्या, असे सांगत बावनकुळे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना या कामात संवेदनशीलतेने लक्ष घालण्याचे आवाहन केले. जागा निश्चिती आणि प्रस्ताव सादर करण्यात दिरंगाई किंवा हयगय खपवून घेतली जाणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. जिल्ह्यांकडून प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांच्या आधारे सर्व समाजातील विद्यार्थ्यांसाठी एकत्रित वसतिगृहांचा शासनस्तरीय आराखडा तयार करण्यात येणार आहे.

बैठकीस आमदार राणा जगजितसिंह पाटील, आमदार संजय बनसोडे, महसूल विभागाचे सहसचिव सं. द. सूर्यवंशी, सहसचिव मनीषा जायभाये, उपसचिव गौरी म्हस्के, उपसचिव भगवान सावंत, इतर मागासवर्ग बहुजन कल्याण विभागाच्या सहसंचालक स्नेहा देवकाते उपस्थित होते. राज्यातील सर्व जिल्हाधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले होते.

## राज्यस्तरीय तलवारबाजी स्पर्धेसाठी वेदिका इंगोलेची निवड, नागपूर विभागीय स्पर्धेत सुवर्णपदकासह कांस्यपदकाची कमाई



**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**

भंडारा येथे नुकत्याच पार पडलेल्या नागपूर विभागीय स्तरीय तलवारबाजी स्पर्धेत सेंट अँन्स इंग्लिश मीडियम स्कूल, दहेगाव (रं.) येथील विद्यार्थिनी वेदिका इंगोले हिने उल्लेखनीय कामगिरी करत राज्यस्तरीय तलवारबाजी स्पर्धेसाठी निवड मिळवली आहे.

नागपूर विभागातील सात जिल्ह्यांतील खेळाडूंच्या सहभागातून झालेल्या या स्पर्धेत वेदिकाने फॉईल प्रकारात सुवर्णपदक, तर इपी प्रकारात कांस्यपदक पटकावले. या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर तिची राज्यस्तरीय तलवारबाजी स्पर्धेसाठी निवड झाली आहे. वेदिकाच्या या यशात तलवारबाजी प्रशिक्षक राहुल मांडवकर, मोनल बागडे आणि तन्मय सावरकर यांचे मार्गदर्शन लाभले. तिच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल नागपूर जिल्हा तलवारबाजी संघटनेचे सचिव मोहम्मद सोयब यांनी वेदिकाचे अभिनंदन केले.

वेदिकाच्या यशाबद्दल मुख्याध्यापिका सिस्टर क्लिओफास, उप मुख्याध्यापिका सिस्टर प्रीती, व्यवस्थापक सिस्टर सीरिया पुष्पम, क्रीडा विभाग प्रमुख खुशाल इंगोले, प्रतीक उमक, सिद्धार्थ माघाडे तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## महिलांनी स्वतःच्या पायावर उभ राहण हीच खरी सक्षमतेची ओळख : रोहिणी शिंदे

**दै. सिंहवाणी वृत्त, बदलापूर**

जनजागृती सेवा संस्थेच्या ग्रुप सदस्यांनी कुळगाव बदलापूर नगरपरिषद आणि ॐग्रामण्ये इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशनल एक्सलेन्स यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत महिला शिबिराला भेट देऊन माहिती जाणून घेतली.



महिला नेहमीच कुटुंबासाठी पुढाकार घेवून झटत असतात, पुरुषांची मक्तेदारी असलेली सगळी क्षेत्रे महिलांनी काबीज केली आहेत. पुरुषांपेक्षा महिला जास्त कार्यक्षम आहेत. पुरुषांच्या तुलनेत जास्त काम करतात आणि त्यांचा मान सन्मान त्यांना मिळाला पाहिजे असे मत जनजागृती सेवा संस्थेचे जेष्ठ सल्लागार आणि समता साहित्य अकादमीचे महाराष्ट्र अध्यक्ष श्रीयुत दिलीप नारकर यांनी केले. श्रीयुत सुहास सावंत यांनी महिलांना डिजिटल माध्यमे आणि सोशल एप्सचा वापर करून आपला व्यवसाय वेगळ्या ऊंचीवर घेवून जाण्याबाबत मार्गदर्शन केले.मनात आणल तर आपण कोणतीही गोष्ट करु शकता! याच जिवंत उदाहरण म्हणजे प्रशिक्षणासाठी वेळात वेळ काढून उत्स्फूर्तपणे सहभागी झालेल्या या सर्व महिला.आपल्या इच्छेला दिशा देऊन,नवनव्या गोष्टी आणि व्यवसायातील गमके समजून घेवून, हें प्रशिक्षण घेवून पुढे आपण आपल्या व्यवसायाची प्रगती कशी करू शकतो याचा विचार करणे आणि आपल्या इच्छेला दिशा देऊन नवीन गोष्ट शिकण्याची तयारी ठेवून आणि हे प्रशिक्षण घेतल्यानंतर आपण पुढे काय करु शकतो? याचा विचार करण हीच खरी प्रगतीतीची सुरुवात आहे.असे मत सोहम इको सोल्युशनच्या संस्थापिका सौ. रोहिणी शिंदे यांनी मांडले.

याप्रसंगी शिवण कामातील विविध प्रकार यासंदर्भात शिक्षिका राणी सचिन भंडारे, मिनाक्षी शदर वाघमारे, ज्योती सागवेकर यांनी बेसिक माहिती सांगितली.तसेच यावेळी जनजागृती ग्रुप सदस्या (संचालिका-सोहम इको सोल्युशन, घनकचरा व्यवस्थापन समुपदेशिका) रोहिणी प्रशांत शिंदे मॅडम यांनी महिलांना शिवणकाम त्यातील बारकावे अशी विविधांगी सविस्तर उपयुक्त माहिती त्यांनी महिलांना दिली.त्याच प्रमाणे जनजागृती सदस्य दिलीप नारकर (अध्यक्ष-समता साहित्य अकादमी महाराष्ट्र), जनजागृती ग्रुप सदस्य सुहास सावंत (अध्यक्ष-उमेद बहुउद्देशीय सामाजिक संस्था), जनजागृती ग्रुप सदस्य राजेंद्र नरसाळे (सचिव-सिटीझन वेल्फेअर असोसिएशन, बदलापूर) यांनीही मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभारप्रदर्शन संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर यांनी केले.हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी ॐग्रामण्ये इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशनल एक्सलेन्सचे डायरेक्टर शिवराम चव्हाण सर, प्रकल्प अधिकारी प्रविण कुंभार सर यांचे मार्गदर्शन लाभले.विशेष म्हणजे कुळगाव बदलापूर नगरपरिषद आयोजित महिला बालकल्याण योजनेअंतर्गत मोफत महिला प्रशिक्षण शिबीरासाठी नगरसेवक किरण भोईर यांच्या विशेष मार्गदर्शन व सहकार्याने हे मोफत महिला प्रशिक्षण शिबीर आनंद दिघे भाजी मार्केट,सहकार हॉटेलच्या मागे, बदलापूर पश्चिम येथे सुरु आहे. या मोफत महिला प्रशिक्षणासाठी महिला व बाल कल्याण अधीक्षक श्रीकांत निकुळे याचे बहुमोल सहकार्य लाभत आहे.

## अन्वय यादव व रिषिका टावरी यांनी पटकावला फिरता चषक
### 'विज्ञान जिज्ञासा २०२६'ला उत्स्फूर्त प्रतिसाद



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

प्रा. राजेंद्र सिंह सायन्स एक्सप्लोरेटरी, नागपूरच्यावतीने आयोजित प्रतिष्ठेची प्रा. व्ही. जी. भिडे स्मृती आंतरशालेय विज्ञान प्रश्नमंजुषा स्पर्धा - 'विज्ञान जिज्ञासा २०२६' उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या स्पर्धेत नागपूर शहरातील २० विविध शाळांमधील एकूण ३४ संघांनी सहभाग घेतला. अंतिम फेरी भारती कृष्णा विद्या विहार स्कूल, नारायणा विद्यालयम्- चिंचभुवन, सेवासदन सक्षम स्कूल, एअर फोर्स स्कूल - वायूसेना नगर आणि सरस्वती विद्यालय या शाळांमधील सहा संघांमध्ये झाली. यंदा ज्ञानज्योती निवासी अंध शाळा, हिंगणा येथील विद्यार्थ्यांचा सहभाग, हे या स्पर्धेचे वैशिष्ट्य ठरले. अंतिम फेरी अत्यंत अटीतटीची आणि रंगतदार झाली. त्यात नारायणा विद्यालयम्, चिंचभुवन येथील अन्वय यादव आणि रिषिका टावरी यांनी प्रथम क्रमांक पटकावत मानाचा फिरता चषक आणि प्रयोग साहित्य संच जिंकला.

भारती कृष्णा विद्या विहार स्कूल येथील अयांश वाडीकर आणि रुजुल लोखंडे यांनी द्वितीय क्रमांक मिळविला. स्पर्धेत सहभागी सर्व विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाला प्रा. व्ही. जी. भिडे यांच्या कन्या डॉ. विदुला कापरे यांची विशेष उपस्थिती लाभली. समारोप समारंभात विजेत्या विद्यार्थ्यांचे पीआरएसएसईचे अध्यक्ष हेमंत चाफले, संचालक डॉ. सीमा उबाळे आणि डॉ. विदुला कापरे यांनी अभिनंदन केले.

## श्राद्ध विधीमध्ये कावळ्यांना महत्त्व
### पितृपक्षात यमाचे प्रतीक, पूर्वजांना अन्नपाणी अर्पण करण्याची परंपरा

**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक (हर्ष कनोजे)**

भारतीय सनातन परंपरेनुसार दिवंगत पूर्वजांचे स्मरण करण्यासाठी, त्यांना आदर व्यक्त करण्यासाठी आणि त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी श्राद्धपक्ष हा एक महत्त्वाचा प्रसंग मानला जातो. पितृपक्षात, पूर्वजांना अन्नपाणी अर्पण करण्यासोबतच तर्पण (अन्नपाणी अर्पण करणे) करण्याची परंपरादेखील शतकानुशतके प्रचलित आहे. धार्मिक मान्यतेनुसार, कावळ्यांना पूर्वजांचे दूत आणि यमाचे प्रतीक मानले जाते. म्हणूनच श्राद्ध विधींमध्ये कावळ्यांना विशेष महत्त्व दिले जाते. हिंदू पंचांगानुसार, भाद्रपद महिन्याच्या पौर्णिमेपासून ते अश्विन महिन्याच्या अमावस्येपर्यंतचा काळ पितृपक्ष मानला जातो. या काळात, लोक आपल्या दिवंगत आई-वडिलांच्या आजीआजोबांच्या आणि इतर पूर्वजांच्या स्मरणार्थ श्राद्ध आणि तर्पण करतात.



पितृपक्षात, विधी पार पाडल्यानंतर,पूर्वजांसाठी तयार केलेले अन्न कावळ्यांना खाऊ प्रथा घालण्याची आहे. कावळे हे पूर्वजांचे दूत असतात ही धार्मिक श्रद्धा : धार्मिक श्रद्धेनुसार, कावळ्याला पूर्वजांचा दूत मानले जाते. असे म्हटले जाते की, जर कावळ्याने श्राद्धाचे अन्न खाल्ले, तर पूर्वजांना अर्पण केलेले अन्न मिळते आणि त्यांना शांती लाभते, असा विश्वास आहे. अनेक कुटुंबांमध्ये, श्राद्धाच्या दिवशी घराबाहेर किंवा छतावर अन्न ठेवले जाते आणि त्याची वाट पाहिली जाते.

**परंपरेसह निसर्ग संवर्धनाचा संदेश**

श्राद्ध पक्ष आपल्याला केवळ आपल्या पूर्वजांचे स्मरण करण्यास मदत करत नाही, तर निसर्ग आणि प्राणी यांच्याप्रती संवेदनशील राहायलाही शिकवतो. कावळ्यांना खाऊ घालण्याची परंपरा केवळ आपल्या पूर्वजांबद्दल आदर आणि कृतज्ञता व्यक्त करत नाही, तर पक्ष्यांप्रती करुणा आणि सहजीवनाची भावना देखील दर्शवते. त्यामुळे कावळे आणि इतर पक्ष्यांचे संरक्षण करण्यासाठी, झाडे आणि वनस्पतींचे संरक्षण करणे, नैसर्गिक पर्यावरणाची देखभाल करणे आणि पक्ष्यांसाठी सुरक्षित आश्रयस्थान उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

**कावळ्यांशिवाय श्राद्ध विधी अपूर्ण मानण्याची परंपरा**

पितृपक्षात, पूर्वजांच्या नावाने पाणी आणि अन्न अर्पण केल्यानंतर कावळ्यांना खाऊ घालण्याच्या परंपरेला विशेष महत्त्व दिले जाते. आजही ग्रामीण भागातील अनेक कुटुंबे ही परंपरा पूर्ण भक्तीभावाने पाळतात. असा विश्वास आहे की कावळ्याच्या माध्यमातून अन्न पूर्वजांपर्यंत पोहोचते आणि त्यांना समाधान मिळते. पारंपरिक समजुतींनुसार, श्राद्ध सोहळ्यानंतर ब्राह्मणांना नैवेद्य दाखवताना कावळ्यांनाही खाऊ घालणे पुण्यकारक मानले जाते.

काही दशकांपूर्वीपर्यंत गावांमध्ये आणि शहरांमध्ये कावळ्यांची संख्या बरीच जास्त होती. पहाट होताच, छतांवर, झाडांवर आणि विजेच्या तारांवर कावळ्यांचे थवे बसलेले दिसायचे. त्यांचा कावकाव हा दैनंदिन जीवनाचा एक भाग होता. श्राद्धाच्या काळात, लोक कावळ्यांना खाऊ घालण्यासाठी खास आपल्या घरांच्या छतांवर आणि अंगणात अन्न ठेवत असत. परंतु, बदलत्या पर्यावरणामुळे आणि शहरीकरणामुळे आता अनेक ठिकाणी कावळ्यांची संख्या पूर्वीपेक्षा कमी झाली आहे.

# महाखनिजमधील तांत्रिक अडथळे दहा दिवसांत दूर करा, अन्यथा कारवाईला सामोरे जा!

## महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा इशारा, विविध विभागांच्या प्रणाली महाखनिज २.० शी जोडण्याचे निर्देश, राज्यव्यापी दौऱ्यात महाखनिजबाबत एकही तक्रार येता कामा नये!

**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**

महाखनिज २.० प्रणालीतील तांत्रिक अडथळे तातडीने दूर करा. पोर्टल संथ होणे, वारंवार एरर येणे किंवा प्रणालीतील अडचणींमुळे नागरिकांची गैरसोय होता कामा नये. येत्या दहा दिवसांत महाखनिजमध्ये स्पष्ट सुधारणा दिसली पाहिजे; अन्यथा संबंधितांवर कठोर कारवाईला सामोरे जावे लागेल, असा स्पष्ट इशारा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज मंत्रालयात झालेल्या बैठकीत दिला.

महाखनिज २.० शी संबंधित विविध विभागांच्या प्रणाली एकमेकांशी जोडून कामकाज अधिक सुरळीत करण्यावरही बैठकीत भर देण्यात आला. बांधकाम परवानग्यांसाठी वापरल्या जाणाऱ्या बीपीएमएस किंवा ऑटो डीसीआर प्रणाली महाखनिज २.०शी तातडीने जोडाव्यात, तसेच संबंधित विभागांनी याबाबत आवश्यक आदेश काढून संलग्नीकरणाची प्रक्रिया पूर्ण करावी, असे निर्देश बावनकुळे यांनी दिले.



विविध विभागांकडील प्रकल्प, कंत्राटदार आणि गौण खनिजांशी संबंधित माहिती महाखनिजवर नोंदवून ती नियमित अद्ययावत ठेवावी. संबंधित विभागांनी महाखनिजवर स्वतंत्र कन्ज्युमर म्हणून नोंदणी करून प्रणालीच्या माध्यमातून माहितीची देवाणघेवाण सुलभ करावी, असेही त्यांनी सांगितले.

पर्यावरण, वन आणि नगरविकास विभागांकडून मिळणाऱ्या नाहरकत प्रमाणपत्रांच्या प्रक्रियेचाही बैठकीत आढावा घेण्यात आला. स्टोन क्रशर आणि आरएमसी प्लांटच्या परवानग्यांशी संबंधित महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची प्रणाली तसेच पर्यावरण मंजुरीसाठीचे पोर्टल महाखनिजशी जोडण्याची प्रक्रिया वेगाने पूर्ण करावी, असे निर्देश देण्यात आले.

खानपट्टा मंजुरीसाठी आवश्यक वन विभागाच्या नाहरकत दाखल्यांचा स्वतंत्र डेटाबेस तयार करून तो महाखनिजशी जोडावा आणि त्यातील माहिती नियमितपणे अद्ययावत ठेवावी, असेही बावनकुळे यांनी सांगितले. त्याचप्रमाणे खाणकामासाठी अनुज्ञेय क्षेत्रांची माहिती महाखनिजवर उपलब्ध करून देण्याच्या सूचना देण्यात आल्या. यामुळे संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयांना आवश्यक माहिती सहज उपलब्ध होणार आहे.

**माझ्या राज्यव्यापी दौऱ्यात तक्रार येता कामा नये!**

महाखनिज प्रणालीतील अडचणींचे केवळ तात्पुरते निराकरण न करता त्यामागील तांत्रिक कारणे शोधून कायमस्वरूपी उपाय करावेत, असे बावनकुळे यांनी अधिकाऱ्यांना स्पष्ट केले. मी आता राज्यव्यापी दौरा करणार आहे. या दौऱ्यात महाखनिजसंदर्भात कोणतीही तक्रार माझ्याकडे येता कामा नये. दहा दिवसांत प्रणालीमध्ये सुधारणा झाली पाहिजे. तांत्रिक अडचणी वेळेत दूर झाल्याच पाहिजेत, असे त्यांनी स्पष्ट केले.

महाखनिज २.० हे गौण खनिजांच्या परवानग्या, वाहतूक, ऑनलाइन प्रक्रिया, वाहन निरीक्षण आणि तक्रार निवारण यांसारख्या कामांसाठी एकत्रित डिजिटल व्यवस्था म्हणून कार्यरत आहे. त्यामुळे नागरिक आणि संबंधित घटकांना प्रत्येक टप्प्यावर सुरळीत सेवा मिळण्यासाठी प्रणालीची तांत्रिक क्षमता आणि विविध विभागांमधील संलग्नीकरण मजबूत करणे आवश्यक असल्याचे बैठकीत स्पष्ट करण्यात आले.

बैठकीस महसूल विभागाच्या सहसचिव मनीषा जायभाये, अपर जिल्हाधिकारी संजय पवार आणि रेलटेल कंपनीचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. कोकण विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीत सहभाग घेतला.

थोडक्यात

### डॉ. मीनाक्षी पाटील यांच्या 'ललद्यदस ललबाय'मधील कवितांचे अभिवाचन उद्या

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

कवयित्री, चित्रकार, ललित लेखिका व सध्या महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या सचिव असलेल्या डॉ. मीनाक्षी पाटील यांच्या 'ललद्यदस ललबाय' या काव्यसंग्रहातील निवडक कवितांच्या अभिवाचनाचा कार्यक्रम शनिवार, १० ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात आला आहे. नित्या आर्टिस्ट सेंटर, मुंबई व निलायम कृष्णकक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने कीर्तन केसरी भाऊसाहेब शेवाळकर सभागृह, शंकरनगर स्क्वेअर, शंकरनगर, धरमपेठ येथे येथे सायंकाळी ५ वाजता हा कार्यक्रम होईल. या कार्यक्रमात वामन पंडित हे कवितांचे अभिवाचन करणार असून चित्रकार डॉ. राजेंद्र चव्हाण यांनी चित्रे साकारली आहेत.

डॉ. मीनाक्षी पाटील यांचे 'इज इट इन युअर डीएनए', 'ललद्यदस ललबाय', 'उत्तर-आधुनिकता आणि मराठी कविता', 'खानदेशी म्हणी व वाक्प्रचार : एक लोकाभ्यास' हे ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. त्यांच्या कवितांचा समावेश विविध विद्यापीठांच्या अभ्यासक्रमांतही करण्यात आला असून त्यांना अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. या विनामूल्य कार्यक्रमाला काव्यप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### अर्पिताची आंतरराष्ट्रीय बास्केटबॉल स्पर्धेकडे वाटचाल

**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**

बबनराव तायवाडे महाविद्यालय कोराडी येथे कार्यरत प्राध्यापिका अर्पिता सुनील जालंदर यांनी स्पेशल ऑलिम्पिक्सच्या



बास्केटबॉल निवड प्रक्रियेत उल्लेखनीय कामगिरी करीत पुढील टप्प्यात प्रवेश मिळविला आहे. ग्वाल्हेर येथे झालेल्या निवड चाचणीत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाल्यानंतर आता तिची ३३ बास्केटबॉलच्या प्री-कॅम्पसाठी निवड झाली आहे. १३ ते १५ सप्टेंबरदरम्यान ग्वाल्हेर येथील सीडीएस मैदानावर स्पेशल ऑलिम्पिक्स बास्केटबॉल निवड चाचणी पार पडली. या चाचणीत महाराष्ट्राच्या संघातून अर्पिताने सहभाग नोंदविला. तिच्या कामगिरीची दखल घेत गांधीनगर गुजरात येथे होणाऱ्या कॅम्प प्रशिक्षणासाठी तिची निवड करण्यात आली.

गुजरातमधील गांधीनगर येथे ५ ते १४ ऑक्टोबरदरम्यान स्पेशल ऑलिम्पिक्स ३३ बास्केटबॉल प्री-कॅम्प आयोजित करण्यात आला आहे. या शिबिरात देशभरातील निवडक खेळाडू सहभागी होणार असून, त्यातून आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी भारतीय संघाची निवड केली जाणार आहे. अर्पिताच्या यशाबद्दल आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक विशाल नाईक क्रीडा शिक्षक धैर्यशील सुटे, राजू ठाकरे, विपीन शर्मा, पत्रकार दिवाकर घेर, अमर जैन, मनोज डेव्हिड, डॉ अहमद शेख, सुनील जालंदर, क्रिष्णा नमलेवार, श्रीराम सातपुते, केशव पानतावणे, प्रकाश साद, दिलीप गजभिये, कपिल वानखेडे, अभय मिश्रा, राजेश खंडारे, विनोद गोडबोले, मयूर तिरपुडे, गिरधारी शर्मा, विक्की थापा आदींनी अभिनंदन केले आहे.

### शेगाव बुज प्रशासकाचा अजब कारभार

#### गावातील खड्डे बुजवण्यासाठी चुरी, मुरुमा ऐवजी चक्क मातीचा वापर?

**दै. सिंहवाणी वृत्त, वरोरा-धर्मेंद्र शेरकुरे**

वरोरा तालुक्यातील शेगाव बु. येथे दरवर्षी मस्कऱ्या गणपती विसर्जन मिरवणूक मोठ्या प्रमाणात उत्साहात काढल्या जाते हे विसर्जन मिरवणूक पाहण्यासाठी जिल्ह्यातील विविध ठिकाणाहुन





भाविक भक्त मोठ्या संख्येने येत असतात, दरवर्षी गणपती मंडळाचे स्वागत करण्यासाठी विविध राजकीय पक्षाकडून मंडप टाकण्यात येते तसेच काही सामाजिक कार्यकर्ते व व्यापारी मंडळीकडून याठिकाणी महाप्रसादाचा कार्यक्रम आयोजित केला जाते तसेच शेगाव येथील जामा मश्जित कमिटी कडून सुद्धा गणपती मंडळाचे उत्साहान स्वागत केले जाते. याच पार्श्वभूमीवर शेगाव बु. येथील मुख्य रस्ता व आष्टा बायपास येथून सर्व गणपतीची मिरवणूक निघत असताना या रस्त्यावर पडलेल्या मोठमोठे खड्डे बुजवण्यासाठी शेगाव प्रशासक यांनी चुरी,मुरमा ऐवजी चक्क मातीचा वापर केलेला आहे.

सुरू असलेल्या सणासुदीच्या काळात तसेच समोर येणाऱ्या नवरात्र ,दसरा, दिवाळी सणामध्ये कदाचित या मातीवर पाऊस पडला किंवा पाणी साचले तर चिखल तयार होऊन अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही, त्यामुळे शेगाव बु. प्रशासकाला हा शहाणपणा सुचला कुठून असा प्रश्न गावातील सुज्ञ नागरीकाकडून उपस्थित करण्यात येत आहे. या बद्दल गावातील नागरिक विनोद राऊत यांनी शेगाव बु. ग्रामपंचायत मध्ये प्रशासक म्हणून असलेले ग्रामसेवक यांना फोन करून विचारणा केली असता आमच्याकडे निधीच उपलब्ध नाही त्यामुळे आम्ही चुरी, मुरमा ऐवजी मातीचा वापर केला असे त्यांनी सांगितले.

### वैकुंठ रथाच्या धडकेत सायकलस्वार कामगाराचा मृत्यू

**नाशिक :** नाशिकच्या सातपूर परिसरातील शिवाजीनगर येथे वैकुंठ रथाने सायकलस्वाराला धडक दिल्याने ५४ वर्षीय कामगाराचा मृत्यू झाला. राम ईश्वर प्रसाद असं मृत कामगाराचं नाव आहे. ड्युटी आटोपून सायकलवरून घरी जात असताना हा अपघात झाला. जखमी राम ईश्वर प्रसाद यांच्यावर उपचार सुरू होते; मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. विशेष म्हणजे, अपघातानंतर दोन दिवसांनी या घटनेचा सीसीटीव्ही व्हिडीओ समोर आला आहे.

## कुमार गंधर्वांच्या बंदिशींमधून उलगडले निसर्गाचे सप्तरंग

### 'ऋतुरंग' कार्यक्रमात डॉ. साधना शिलेदार आणि डॉ. मुकुंद ओक यांचे भावपूर्ण गायन




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

पंडित कुमार गंधर्व यांच्या निसर्ग आणि ऋतुवर्णनपर बंदिशींमधून ऋतूंचे बदलते रंग, निसर्गसौंदर्य आणि मानवी भावभावनांचा सुरेल आविष्कार घडविणारा 'ऋतुरंग' हा विशेष सांगीतिक कार्यक्रम गुरुवारी अरुणाई आणि सप्तक नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने सायंटिफिक सभागृह, आठ रस्ता चौक, लक्ष्मीनगर येथे आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात शास्त्रीय गायिका डॉ. साधना शिलेदार आणि गायक डॉ. मुकुंद ओक यांनी विविध रागांतील बंदिशींचे भावपूर्ण गायन सादर करून रसिकांना भारतीय शास्त्रीय संगीताच्या समृद्ध विश्वाची अनुभूती दिली.

कार्यक्रमाची सुरुवात राग मारवामध्ये निबद्ध एकतालातील विलंबित बंदिशीने झाली. घाम परे रे, बाऊ न चाल्यो हे, या बंदिशीतून उन्हाची तीव्रता आणि त्यामुळे निर्माण होणारी अस्वस्थता स्वरबद्ध झाली. त्यानंतर राग सोरठदेसा, त्रितालातील मध्यलयीतील नयो नयो मेह जेठ संग निकरे, या रचनेतून नव्या मेघांचे आगमन आणि पावसाची चाहूल व्यक्त झाली. राग श्रीकल्याणमधील देखो रे उत फुलन लगी, या बंदिशीतून फुलू लागलेल्या निसगार्चे सौंदर्य आणि त्यातून उमटणारा आनंद खुलला. राग मालकौंसच्या द्रुतलयीतील फूल बेदाग ये बन-बन धन भरे, खिरे सुंदर, या रचनेतून फुलांनी बहरलेल्या वनाचे मनोहारी चित्र उभे राहिले.

त्रितालातील मध्यलयीतील अमरैयाँ के बिरखन के पातन पर पटपिंजासी बुंदियाँ चमके, या बंदिशीतून आंब्याच्या झाडांच्या पानांवर चमकणाऱ्या पावसाच्या थेंबांचे निसर्गरम्य चित्र साकारले. तर द्रुतलयीतील ह्यघन गरजे, बरखा आई, गरज-गरज मोहे डराई, या रचनेतून ढगांचा गडगडाट, मुसळधार पाऊस आणि पावसाळी वातावरणातील रोमांच अनुभवायला मिळाला.

राग गौरीबसंत मधील आज पेरिले गोरी रंग बसंती चिरा, या बंदिशीतून वसंत ऋतूचे आगमन आणि निसर्गातील रंगांची उधळण व्यक्त झाली. याशिवाय राग बसंत, बागेश्री, मियाँ मल्हार, तोडी, सोहनी, मधवा आणि चैती मांड यांसारख्या रागांतील रचनाही सादर करण्यात आल्या. याशिवाय राग बसंत, राग बागेश्री, राग मियाँ मल्हार, राग तोडी, राग सोहनी, राग मधवा आणि राग चैती मांड यांसारख्या विविध रागांची सुरेल प्रस्तुती करण्यात आली.

गायकांना संवादिनीवर संदीप गुरुमुळे यांची संगत लाभली, तर तबल्यावर विपुल ढोले आणि वीरथ वाडेगावकर यांनी प्रभावी साथसंगत केली. तानपुऱ्यावर वल्लरी मांडवगडे आणि मिताली आनंद यांनी साथ दिली. कार्यक्रमाची प्रस्तावना डॉ. उदय गुप्ते यांनी केली, तर निवेदनाची धुरा वृषाली देशपांडे यांनी सांभाळली.

## हनुमान नगर झोनमध्ये नागरी सुविधांचा बोजवारा

### प्रभाग २९ व ३४ मधील नगरांमध्ये डेंगूचा प्रभाव, कचरा गाडी, सफाई कर्मचारी, मच्छर फॉगिंग, फवारणी, स्ट्रीट लाईट बंद अंधार आणि उद्यानांची दुरवस्था



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

हनुमान नगर झोन अंतर्गत येणाऱ्या प्रभाग २९ मधील नवीन म्हाळगी नगर, गजानन नगर, महात्मा गांधी नगर, प्रेरणा नगर, विनायक नगर, सन्मार्ग नगर, संतोषी नगर, तसेच नरसाळा येथील श्रेयस नगर तसेच प्रभाग ३४ मधील शेष नगर, अमर नगर, सिद्धेश्वरी नगर आणि अमर नगर मध्ये नागरी सुविधांचा पूर्णपणे बोजवारा उडाला आहे. या विरोधात आज दक्षिण नागपूर शिवसेनाच्या वतीने हनुमान नगर झोन कार्यालयातील अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

या भागांमध्ये कचरा गाडी नियमित येत नसून ३ ते ४ दिवसांआड येते. त्यामुळे घराघरात व रस्त्यावर कचऱ्याचे ढीग साचले असून दुर्गंधी पसरली आहे. सफाई कर्मचारी वेळेवर येत नसल्याने नाल्या व गटारी तुंबल्या आहेत. डासांचा प्रादुर्भाव वाढल्याने नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे.

या सर्व नगरांमधील बहुतांश स्ट्रीट लाईट गेल्या अनेक महिन्यांपासून बंद आहेत. सायंकाळ नंतर संपूर्ण परिसरात अंधार पसरतो. अंधारामुळे महिला व विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण असून चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. या भागातील उद्यानांची देखील दुरवस्था झाली आहे. झाडे-झुडपे वाढली असून बसण्याची व्यवस्था नाही, लहान मुलांच्या खेळण्याचे साहित्य तुटलेले आहे, पिण्याच्या पाण्याची सोय नाही. नागरिकांच्या या मूलभूत समस्या तात्काळ सोडवाव्यात, अन्यथा शिवसेना स्टाईल तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा या निवेदनातून देण्यात आला आहे.

निवेदन देतेवेळी विशाल कोरके, धम्मा सोनटक्के, गौरव तिजारे, निरंजन नाकाडे, राकेश भोंदले, विशाल मानकर, आझाद ठाकूर, अनंता देवगिरकर, विनोद चकोर, विभोर भगत, अनंत वाघमारे, अमित पाटील, सुरज कावळे, यशपाल रिमी रगडे, निलेश वाघमारे आदी शिवसैनिक व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ....अखेर अनधिकृत देशी दारू दुकानावर फिरला बुलडोजर

### ग्रामस्थांचा संताप उफाळला, फटाके फोडून जल्लोष!, राहुल तिवारी यांचे उपोषण सातव्या दिवशी स्थगित, प्रकृती खालावल्याने रुग्णालयात दाखल, तणावपूर्ण शांतता, चोख पोलीस बंदोबस्त



**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**

राष्ट्रीय महामार्गाच्या जागेवर गेल्या अनेक वर्षांपासून ठाण मांडून बसलेल्या अनधिकृत देशी दारूच्या दुकानावर अखेर संतप्त ग्रामस्थांनी बुलडोजर फिरवून जमीनदोस्त केले. प्रशासकीय आदेशाची वाट न पाहता संतप्त जमावाने गुरुवारी सकाळी कारवाईचा बडगा उचलल्याने परिसरात एकच खळबळ उडाली अनधिकृत देशी दारूचे दुकान जमीनदोस्त होताच शेकडो महिला व नागरिकांनी टाळ्यांच्या गजरात स्वागत केले शिवाय फटाक्यांची जोरदार आतषबाजी करत जल्लोष साजरा केला.

अनधिकृत दारू दुकानासह इतर स्थानिक मागण्यांसाठी माजी उपसभापती राहुल तिवारी यांनी महात्मा गांधी जयंतीचे औचित्य साधून २ ऑक्टोबर पासून बेमुदत उपोषण सुरू केले होते. तिवारी यांच्या आंदोलनाचा वाढता दबाव पाहून चनकापूर ग्रामपंचायत प्रशासनाने अन्नामोड परिसरातील राष्ट्रीय महामार्गाच्या जागेवरील अनधिकृत देशी दारू दुकानाचे अतिक्रमण ८ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता रिकामे निर्णय जाहीर केला होता.

दरम्यान, ७ ऑक्टोबर रोजी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने राष्ट्रीय महामार्ग २४४ दहेगाव (रंगारी) खापरखेडा-कामठी परिसरातील सर्व अतिक्रमण काढण्याबाबत नोटिसा अतिक्रमण धारकांना जारी केल्या तर दुसरीकडे देशी दारू दुकान संचालकाने चनकापूर ग्रामपंचायत प्रशासनाला कायदेशीर नोटीस दिली त्यामूळे ग्रामपंचायत प्रशासन वरिष्ठांचे मार्गदर्शन घेत होते. अतिक्रमण कारवाईसाठी दोन जेसीबी व ट्रॅक्टर घटनास्थळी तैनात आले होते मात्र चनकापूर ग्रामपंचायत प्रशासनाकडून कारवाईचे आदेश दिले नव्हते.

गुरुवारला सकाळ पासूनच अन्नामोड अनधिकृत देशी दारू दुकान परिसरात शेकडो नागरिक व महिलांची गर्दी जमली होती यावेळी संतप्त ग्रामस्थांनी दोन जेसीबीच्या साहाय्याने दारूचे दुकान जमीनदोस्त केले त्यामूळे काही काळ तणाव निर्माण झाला होता.

**५ लाखांचे नुकसान झाल्याचा आरोप!**

अतिक्रमण कारवाई दरम्यान देशी दारूच्या गल्लूयातील १५ हजार रुपये रोख गायब झाले शिवाय ५ लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा आरोप देशी दारू दुकान संचालकाने केला.

यासंदर्भात ग्रामपंचायत अधिकारी पंकज दांगट यांच्याशी संपर्क साधला असता राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण व देशी दारू दुकानदाराच्या कायदेशीर नोटिस प्राप्त झाले होते त्यामूळे वरिष्ठांचे मार्गदर्शन घेत होतो यादरम्यान बुलडोजरने केव्हा अतिक्रमण कारवाई झाली याबाबत मला कल्पना नसल्याचे प्रस्तुत प्रतिनिधीला सांगितले.

**राहुल तिवारींची प्रकृती खालावली, उपोषण तूर्तास स्थगित!**

आंदोलनाच्या सातव्या दिवशी ८ ऑक्टोबर गुरुवारला दुपारच्या सुमारास माजी उपसभापती राहुल तिवारी यांची प्रकृती अचानक खालावली त्यांना दहेगाव रंगारी येथील न्यू लाईफ रुग्णालयात दाखल करण्यात आले यावेळी माजी मंत्री सुनील केदार यांनी रुग्णालयात जाऊन तिवारी यांची भेट घेतली यावेळी नारळ पाणी देऊन तिवारी यांनी आपले उपोषण तूर्तास स्थगित केले याप्रसंगी वीज केंद्राचे मुख्य अभियंता भूषण शिंदे राहुल तिवारी यांच्या मागण्यांवर तोडगा काढण्याचे आश्वासन दिले मात्र वेकोली प्रशासनाने याबाबत कोणतीही भूमिका घेतली नाही.



दैनिक
सिंहवाणी वृत्त

# अभिनयाचा युगपुरुष हरपला!

## नटसम्राट हरपला

शेती मातीशी आणि अभिनयाची इमान राखणारे हाडाचे अभिनेते आणि शेतकऱ्यांचे कनवाळू नाना गेले... वाचून जरा धक्काच बसला. क्षणभर वाटून गेलं की ही फेक वार्ता असावी. मात्र, समाजमाध्यमांवर श्रद्धांजलीचा पाऊस पडायला लागला आणि शेवटी मनानं दगड होत स्वीकारावं लागलं की आपल्या कसदार अभिनयानं आणि तितक्याच ताकदीच्या आवाजानं प्रेक्षकांच्या हृदयात कायमचं स्थान निर्माण करणारे नाना कायमचे सोडून गेले. खूप वाईट वाटलं. मात्र, नियतीच्या लेखनाला कोण अडविणार? आला त्याला जाणेच आहे. त्यामुळे शोक अनावर होत असला तरी नाना आपल्यात नाहीत, हे शाश्वत स्वीकारावे लागते. क्षणभर डोळे मिटावे आणि नानांना आठवावे म्हटले तर गेल्या वर्षभरात यू ट्यूबवर बघितलेल्या त्यांच्या चित्रपटांच्या रिल्स आपोआप डोळ्यापुढे सरकू लागल्या. भूमिका कुठलीही असो. पोलिस, सैनिक, विनोदी किंवा खलनायक... प्रत्येक भूमिकेत सजीवता निर्माण करणारा नाना मला हिंदी चित्रपटांचा बादशहा अमिताभ बच्चन पेक्षाही सरस वाटला. मला आठवते, फार पूर्वी त्यांची सह्याद्री वाहिनीवर एक मराठी मालिका यायची. त्यात नानांनी ऊसतोड कामगारांच्या मुकादमाची भूमिका केलेली होती. ही गोष्ट कदाचित इतरांच्या लक्षातून उतरली असावी. मात्र, नानांनी जितक्या सहजतेने हिंदी चित्रपटांत भूमिका साकारल्या, तितक्याच सहजतेने आधी मराठी नाटकांत आणि चित्रपटांत सुद्धा अभिनय केला आहे. १९७८ सालच्या गमन चित्रपटातून हिंदी चित्रपट सृष्टीत पदार्पण करणारा नाना गाजला तो प्रहार पासून. एकेकाळी देशभक्तीपर चित्रपट काढणारे मनोज कुमार जसे प्रेक्षकांच्या हृदयात बसले अगदी तसेच नानांचे झाले. अंकुश, परिंदा, प्रहार, तिरंगा, क्रांतिवीर, अग्नीसाक्षी, वेलकम, अब तक छप्पन, वजूद, खामोशी, राजनीती, कोहराम, टॅक्सी नंबर ९२११, यशवंत आदी हिंदी चित्रपटांसह नटसम्राट, आपला माणूस, देऊळ, हेमलकसा, माफीचा साक्षीदार, भालू, पक पक पकाक, सिंहासन असे कितीतरी गाजलेले मराठी चित्रपट नाना हा चित्रपट सृष्टीतील बादशहा होता... सम्राट होता हे सांगण्यास पुरेसे आहेत.

मुंबईच्या साध्या चाळीतल्या घरात गणेशोत्सव साजरा करणारा नाना शेतकऱ्यांचा कैवारी होता. मराठी चित्रपट अभिनेते मकरंद अनासपुरे आणि नानांनी मिळून राज्यातल्या शेतकरी विधवांसाठी नाम फाउंडेशनच्या स्थापना केली आणि त्यांच्या वेदनांवर फुंकर मारण्याचा प्रयत्न केला. याचे जाळे राज्यभर विणण्यासाठी नानांनी आणि मकरंद यांनी केलेल्या दौऱ्यांनी अनेक वृत्तपत्रांचे रकाने भरल्या गेले आहेत. प्रसिद्धीच्या शिखरावर असतांना सुद्धा नानांनी कधी समाजाच्या दृष्टीने विघातक अशा कुठल्याही जाहिराती करणे नाकारल्या. कदाचित त्यांच्या स्पष्टवक्तेपणामुळे कुणी विचारण्याचे धाडस सुद्धा केले नसावे. हे नानाचे वैशिष्ट्य. मध्यंतरी चित्रपट सृष्टीतील नित्याची बाब समजल्या जाणाऱ्या प्रेमाची झुळूक नानांच्या आयुष्यात देखील येऊन गेली. मग ती माधुरी दीक्षित असो नाहीतर मनिषा कोइराला असो. यांच्याशी नानांचे नाव जुळल्या गेले. मात्र, नाना ते नानाच! तनुश्री दत्ता नामक अभिनेत्रीने नानावर केलेली चिखलफेक ऐकून अख्ख्या देशाला वाईट वाटले. त्यांचा चाहता वर्ग नानांच्या बाजूने सदैव उभा राहिला. साधं राहणीमान आणि स्पष्टवक्ता असलेले नाना प्रेक्षकांच्या हृदयात इतके उतरले की, सरकारच्या विरोधात समाज माध्यमांवर एखादी पोस्ट टाकण्यासाठी सुद्धा नानांच्या छायाचित्रांचा वापर होऊ लागला. वजूद मधील गीतकार जावेद अख्तर यांनी लिहिलेली "कैसे बताऊँ मैं तुम्हें" ही कविता ज्या अंदाजात व्यक्त करण्यात आली. ते फक्त नानाच करू शकत होते, हे अभिमानाने सांगावेसे वाटते. नानांचे संवाद ऐकून मात्र नट असावा तर असा, असे वाटून जायचे. कित्येक वर्ष नानांचे संवाद तरुणांच्या तोंडी रेंगाळत रहायचे. क्रांतिवीर मधील,"आ गये मेरे मौत का तमाशा देखने, तिरंगा चित्रपटातील, "मैं शिवाजीराव वाघले..." यशवंत चित्रपटातील,"एक मच्छर साला आदमी को हिजडा बना देता है..." याच चित्रपटातील आणखी एक संवाद,"सौ मे से अस्सी बेईमान फिर भी मेरा देश महान," "वेलकम मधील भगवान का दिया मेरे पास सबकुछ हैं," असे कितीतरी संवाद आहेत ज्यांनी चित्रपटांना उचलून धरले.

आता हे सारे संवाद आणि या सर्व आठवणी सोडून नानांनी ईश्वराच्या दरबारात आपल्या कलेचे प्रदर्शन करण्यासाठी कूच केले आहे. कदाचित हेच त्यांच्या आयुष्याचे नवे पर्व असावे. असो... नानासारखा नट पुन्हा होणे शक्य नाही. नाना गेले... कलेवर जिवापाड प्रेम करणारा नटसम्राट हरपला... अवघ्या प्रेक्षक वगार्लाच नव्हे तर चित्रपट सृष्टीला देखील वेड लावणारे नाना काळाच्या पडद्याआड गेले...रंगमंच पोरका झाला. सिनेमाच्या रुपेरी पडद्यावर आपल्या दमदार आणि विशिष्ट शैलीत धडकणारे नाना गेले... कला हीच माझी पूजा आणि प्रेक्षक हेच माझे देव असे अभिमानाने म्हणणारे नाना गेले...हे जड अंतःकरणाने स्वीकारावे लागते. नानाच्या एका छोट्याशा चाहत्याकडून क्रांतिवीर ... नटसम्राट नानांना शब्दांची भावपूर्ण श्रद्धांजली...

**-लीलाधर दवंडे, कामठी (नागपूर)**
**८४१२८७७२२०**

## पडद्यावरचा 'क्रांतिवीर' आणि शेतकऱ्यांचा 'महानायक' हरपला

'क्रांतिवीर' चित्रपटात भूमिका साकारणारे ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांचे वयाच्या ७५ व्या वर्षी निधन झाले आहे. ते गोव्यातील डोना पौला येथील त्यांच्या निवासस्थानी बेशुद्ध अवस्थेत आढळले आणि त्यांना तातडीने एका खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले, जिथे डॉक्टरांनी त्यांना तीव्र हृदयविकाराच्या झटक्याने मृत घोषित केले.

आपल्या दमदार आवाजासाठी, स्पष्टवक्तेपणासाठी आणि प्रभावी संवादफेकीसाठी ओळखल्या जाणाऱ्या नाना पाटेकर यांच्या निधनाने भारतीय चित्रपटसृष्टीतील एका गौरवशाली युगाचा अंत झाला आहे.

नाना पाटेकर हे भारतीय चित्रपटसृष्टीतील एक दिग्गज आणि अष्टपैलू अभिनेते असण्यासोबतच एक संवेदनशील समाजसेवक म्हणूनही त्यांची ओळख होती. पाटेकर रुपेरी पडद्यावर आपल्या खणखणीत संवादांनी प्रेक्षकांना खिळवून ठेवणाऱ्या नानांनी खऱ्या आयुष्यात मात्र अत्यंत साधेपणा जपला होता, समाजातील गरजूंच्या मदतीसाठी स्वतःला वाहून घेतले होते. त्यांचा चित्रपट कलाकारापासून ते एक आदरणीय समाजसेवक बनण्यापर्यंतचा प्रवास थक्क करणारा आहे.

नाना पाटेकर यांनी मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीला अनेक अजरामर चित्रपट आणि व्यक्तिमत्त्वे दिली आहेत. त्यांच्या अभिनयाची एक वेगळी आणि आक्रमक शैली होती. त्यांनी 'क्रांतिवीर', 'तिरंगा', 'यशवंत', 'अग्निसाक्षी', 'परिंदा', 'वेलकम' आणि मराठीतील 'नटसम्राट' यांसारख्या अनेक चित्रपटांमध्ये उत्कृष्ट भूमिका साकारल्या.

त्यांचे कडक संवाद आणि अभिनय शैली आजही प्रेक्षकांच्या मनावर राज्य करतात. त्यांना राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार आणि पद्मश्री पुरस्कारानेही सन्मानित करण्यात आले होते.

चित्रपटसृष्टीत नाना पाटेकर यांनी अशा भूमिका साकारल्या ज्यांनी प्रेक्षकांना अंतर्मुख केलं आणि व्यवस्थेविरुद्ध आवाज उठवण्याची प्रेरणा दिली १९९४ मधील 'क्रांतिवीर' चित्रपटातील त्यांची प्रताप नारायण टिळक ही भूमिका त्यांच्या कारकिर्दीतील मैलाचा दगड ठरली. समाजातील भ्रष्टाचार आणि अन्यायाविरुद्ध त्यांनी फोडलेला टाहो आणि दिलेले खणखणीत संवाद आजही लोकांच्या अंगावर काटा आणतात.

'परिंदा' मधील खलनायक अण्णा, 'तिरंगा' मधील कडक पोलीस अधिकारी शिवाजराव वागळे, ते 'नटसम्राट' मधील गणपतराव बेलवलकर अशा एकापेक्षा एक आव्हानात्मक भूमिका त्यांनी लीलया पेलल्या. त्यांचे पॉझेस (थांबे), आवाजातील चढ-उतार आणि चेहऱ्यावरील हावभाव ही त्यांची सर्वात मोठी ताकद होती ज्याने हिंदी आणि मराठी सिनेसृष्टीला एक नवा चेहरा दिला.

**समाजसेवक म्हणून प्रवास**

चित्रपटांतून अमाप प्रसिद्धी मिळवूनही नाना पाटेकर यांनी आपले पाय जमिनीवर ठेवले.त्यांनी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची भीषण परिस्थिती पाहून त्यांचे मन हेलावले आणि त्यांनी प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली.त्यांनी

'नाम फाउंडेशन'ची स्थापना २०१५ केली. नाना पाटेकर आणि अभिनेते मकरंद अनासपुरे यांनी २०१५ मध्ये नाम फाउंडेशन या स्वयंसेवी संस्थेची स्थापना केली. या संस्थेच्या माध्यमातून दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना थेट मदत केली जाते.

आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबांना धीर देण्यासाठी नानांनी स्वतः गावोगावी जाऊन शेकडो कुटुंबांना प्रत्येकी १५,००० रुपयांची आर्थिक मदत आणि जीवनावश्यक वस्तूंचे वाटप केले.

नाम फाउंडेशन अंतर्गत अनेक गावांमधील नद्यांचे खोलीकरण, गाळ काढणे, विहिरी बांधणे आणि पाण्याचे स्त्रोत पुनरुज्जीवित करण्याचे मोठे काम करण्यात आले. यामुळे अनेक गावे पाण्यासाठी स्वावलंबी झाली आहेत.

नाना पाटेकर त्यांच्या चित्रपट आणि इतर उत्पन्नातील अंदाजे ९०% हिस्सा सामाजिक कायासाठी आणि गरिबांच्या कल्याणासाठी दान करत होते. करोडोंची संपत्ती आणि प्रचंड प्रसिद्धी असूनही नाना पाटेकर अत्यंत साधे जीवन होते आपल्या कमाईचा एक खूप मोठा हिस्सा ते प्रसिद्धीची हाव न धरता गुप्तपणे समाजकार्यासाठी दान करत होते. नाना पाटेकर हे केवळ रुपेरी पडद्यावरील 'रील हिरो' नव्हते तर, समाजाच्या कठीण काळात धावून जाणारे खऱ्या आयुष्यातील 'रिअल हिरो' होते. कला आणि सामाजिक बांधिलकी यांचा सुरेख संगम त्यांच्या व्यक्तिमत्त्वात होते.

सिनेमात डायलॉग मारणे सोपे असते, पण प्रत्यक्ष मैदानात उतरून काम करणे कठीण असते,"' हे नाना पाटेकरांनी आपल्या कृतीतून सिद्ध करून दाखवले होते म्हणूनच महाराष्ट्रातील जनतेच्या हृदयात त्यांचे स्थान केवळ एक अभिनेता म्हणून नाही, तर एक 'लोकनायक' म्हणून अजरामर राहतील.

**– प्रा डॉ सुधीर अग्रवाल, वर्धा**

## ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या निधनाने कला आणि सामाजिक क्षेत्राची मोठी हानी : आमदार डॉ. आशिषराव देशमुख



ज्येष्ठ अभिनेते, दिग्दर्शक आणि रंगकर्मी नाना पाटेकर यांच्या निधनाचे वृत्त अत्यंत दुःखद आणि मनाला चटका लावणारे आहे. आपल्या दमदार अभिनयाने, प्रभावी संवादफेकीने आणि संवेदनशील व्यक्तिमत्त्वाने नाना पाटेकर यांनी मराठी तसेच हिंदी चित्रपटसृष्टीत स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. नाना पाटेकर हे केवळ उत्कृष्ट अभिनेते नव्हते, तर सामाजिक बांधिलकी जपणारे संवेदनशील व्यक्तिमत्त्व होते. शेतकरी मित्र, पर्यावरणवादी व नटसम्राट म्हणून त्यांची ओळख होती. त्यांच्या अभिनयाची ताकद, वास्तववादी मांडणी आणि समाजातील विविध प्रश्नांकडे पाहण्याची त्यांची दृष्टी कायम स्मरणात राहील. त्यांच्या निधनाने भारतीय चित्रपटसृष्टीतील एका अष्टपैलू आणि प्रतिभावान कलाकाराला आपण गमावले आहे.

नाना पाटेकर यांच्या कुटुंबीय, आप्तस्वकीय, सहकलाकार आणि असंख्य चाहत्यांच्या दुःखात मी मनःपूर्वक सहभागी आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो आणि त्यांच्या कुटुंबीयांना हे दुःख सहन करण्याची शक्ती देवो, अशी शोक संवेदना सावनेर- कळमेश्वरचे आमदार डॉ. आशिषराव देशमुख यांनी व्यक्त केली.



## संवेदनशील कलावंत हरपला!

अभिनयाच्या माध्यमातून समाजमनाला अस्वस्थ करणारा प्रश्न विचारणारा आणि आपल्या संवेदनशील सामाजिक कायार्तून माणुसकीची नवी ओळख निर्माण करणारा कलावंत म्हणजे नाना पाटेकर. ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या निधनाचे वृत्त अत्यंत दुःखद आणि मन हेलावून टाकणारे आहे. आपल्या प्रभावी अभिनयाने त्यांनी मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीत अढळ स्थान निर्माण केले. पडद्यावरील प्रत्येक भूमिका त्यांनी जिवंत केली आणि आपल्या संवादातून समाजातील वास्तवावर भाष्य केले.

मात्र नाना पाटेकर हे केवळ उत्तम अभिनेते नव्हते; ते संवेदनशील माणूस आणि समाजासाठी सदैव उभे राहणारे व्यक्तिमत्त्व होते. शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी त्यांनी उभे केलेले कार्य आणि नाम फाउंडेशनच्या माध्यमातून सुरू असलेली सेवा ही त्यांच्या सामाजिक बांधिलकीची प्रेरणादायी साक्ष आहे. कलेची ताकद समाजाच्या वेदनेशी जोडणारा हा महान कलावंत आज आपल्यातून निघून गेला आहे. त्यांच्या निधनाने कला, समाजसेवा आणि संवेदनशीलतेच्या क्षेत्राची मोठी हानी झाली आहे.नाना पाटेकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो आणि त्यांच्या कुटुंबीय, आप्तस्वकीय व असंख्य चाहत्यांना हे दुःख सहन करण्याची शक्ती देवो.

ॐ शांती!

**– अभिजित वंजारी**
**आमदार, नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघ**



## सामाजिक जाणिव असलेला अभिनेता गमावला : महापौर निता ठाकरे

आपल्या दमदार अभियनाने मराठी नाट्यसृष्टी व हिंदी चित्रपट सृष्टीत वेगळे स्थान निर्माण करणारे अभिनेता नाना पाटेकर यांच्या निधनाने एक सामाजिक जाणिव असलेला अभिनेता गमावला आहे, अशा शब्दात महापौर निता ठाकरे यांनी शोक संवेदना व्यक्त केली आहे. मराठी नाट्यसृष्टीत आपल्या अभिनयाची मोहर उमटविल्यानंतर त्यांनी हिंदी चित्रपटसृष्टी दमदार अभिनयाने गाजविली. हिंदी चित्रपटांमध्ये विविधांगी भूमिका वठवून त्यांनी अभिनयाच्या क्षेत्रात एक वेगळे स्थान निर्माण केले होते. अभिनेता म्हणून काम करताना त्यांनी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी नाम नावाची संस्था उभी केली. या माध्यमातून त्यांनी सामाजिक जाणिवेतून राज्यातील शेतकऱ्यांना मदत करण्याचा प्रयत्न केला, असे श्रीमती ठाकरे यांनी शोक संदेशात म्हटले आहे.







